नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपेकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ



विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

१९४७ :: ★ आजच्या अंकातील लेखक व कवि ★ :: किंमत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

यु ग वा णी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

कविता
१ दळण-पां. श्रा. गोरे ...२०९
२ रात्रीं-द. चिं. सोमण २१०
३ अंधःकार भरे-मनोहर शिरवाडकर...२११
४ कमळण-प्रा. पु. शि. रेगे, बी. एस् सी....२११
५ साक्षात्कार-ना. ना. हूड, बी. ए., एल् एल्. बी....२११
थोरांचा परिचय
१ पांडुरंग श्रावण गोरे-ना. ना. हूड, बी. ए., एल्, एल्. बी....२१२
२ दोन राजर्षि-२ माधवराव शिंदे- रा. ब. गो. स. सरदेसाई, बी. ए. २१४
प्रबंध
१ भावगीताचीं भावंडें- प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए. ...२१८
२ वाङ्मयाचें मूल्यमापन- प्रा. अ. ना. देशपांडे, एम्. ए. २२६
ललित गद्य
१ शमन-गो. रा. दोडके, बी. ए....२३३
२ इसाडोरा डंकनचीं मुलें- शरच्चंद्र टोंगो, बी. ए....२३६
विविध
संपादकीय ...२४०

क्षमस्व !

युगवाणीचा हा अंक इतक्या विलंबाने वाचकांचे हातीं देतांना आम्हाला अतिशय खेद होत आहे. युगवाणीचे पुनः जोड अंक सुरू होतात काय अशी धडकी वाचकांच्या मनांत भरली असली तर नवल नाही. पण तसें कांहीहि नसल्याचा निर्वाळा वाचकांना द्यावासा वाटतो.

युगवाणीसाठी घेतलेला कागद अजूनहि आमचे हातीं आला नाही. युगवाणीचा आकार इतर मासिकांपेक्षा वेगळा असल्या कारणाने दुसरा कोणाचाहि कागद तसा चालत नाहीं. अर्थात् नुकसान सोसून छापल्यास छापतां येतो व तसा तो आतापर्यंत उधार-उसनवारी करून छापलाहि !

अंक थोडासा रोडावला असल्याचें वाचकांच्या ध्यानांत येईलच. परंतु त्याची भरपाई ऑगस्ट अंकांत करून देण्यांत येईल. वाचकांच्या झालेल्या गैरसोईबद्दल वाचक क्षमा करतील अशी आशा आहे.

—व्यवस्थापक

संपादकीय (मल पृष्ठ ३ वरून चालू)

घेतला आहे! या वावटळींत बामणगांवकर सापडले असते, तर त्यांनाहि थोडाथोडका लाभ झाला नसता! पण त्यांचा मोठेपणा याच गोष्टींत आहे की, कसल्याहि लाभाची अपेक्षा न बाळगतां ते जन्मभर जातीयतेपासून अलिप्तच राहिले!

'धनुर्भंग', 'आत्मतेज' — वगैरे नाटकें लिहून बामणगांवकरांनी रंगभूमीची सेवा केलेली आहे, तीहि जनता-जनार्दनाच्या चरणीं रुजू आहे.

—अशा या त्यागी देशभक्ताचें या मंगल प्रसंगीं मी मनःपूर्वक अभिनंदन करतों व त्यांस दीर्घायुरारोग्य चिंतितों.

● ● ●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ-साहित्य-संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष २ रें
अंक ७ वा

: संपादक :
वामन नारायण देशपांडे

जूलै
१९४७

दळण

★

दळतें ग ! दळण
उठून रामपारीं
लेकरू मांडीवरी !

पुरे न सांजेला हे
सुपांत दाणे शेर
पदरीं जीव चार !

धन्याला बाई ! रोज
मजुरी पैसे बारा
संसार त्यांत सारा !

पोटाला पाळू[1] माझ्या
बांधतें आवळून
पेटतें जरी रान !

दु:ख न माझें मला
उपाशी परी बाळें
अंतर खळबळे !

सोसे न वारा गार
कापतो थरथर
उघडा सुकुमार !

पाडूं मी गांठी किती
नेसतां ये न धड
फाटकें दानखड !

धन्याचें धोतरही
फाटून झालें चिन्या !
न काम सुई-दोन्या !

आगीच्या पोटीं रोज
जळतें ओलें खोड
पाण्याचा आटे आड !

देती न गानीं कान
पाहण्या फोड हाता
रिकामा कोण दाता ?

सत्कवि पां. श्रा. गोरे शेत-करी-कामकरी यांचीं सुख-दु:खें आत्मीयतेने रंगवितात, याचा प्रत्यय या गीतावरून पुनः एकदा येईल.

१ फडकें.

पांडुरंग श्रावण गोरे

●

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ
मकर संक्रांत : १९२३

रात्रीं

★ वाशीमचे कवि द. चिं. सोमण यांच्या या सुंदर कवितेंतील आरंभींची कल्पकता उल्लेखनीय आहे. मराठींत कवितेमध्ये शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग क्वचितच करण्यांत येतो !

आकाशाच्या विशाल पात्रीं
द्रावण करिते वेडी रात्री
स्फटिक तयांतिल अनंत कोटी
ढवळुन ढवळुन विरघळवी ती
लहान मोठे क्रमें लोपतां
चढूं लागते द्रवा शुभ्रता
अंतिं धवळतां काळा पेला
टाकुनि जाते निजधामाला
सायंकाळीं दुसऱ्या दिवशीं
परतायाला गेली तैशी
द्रवांत इकडे स्फटिक पुन्हा पण
तसेच बनवी सुस्थिर द्रावण
काळा ठिक्कर पुनरपि हो द्रव
पुन्हा धवलता रजनी दे नव
अशा तमीच्या गमनागमनीं
युगें लोटलीं कधीपासुनी
कुणास ठावें प्रश्न कशाला ?
वेडीची ती प्रयोगशाळा
उद्देशें का विशिष्ट असला
प्रयोग अविरत तिचा चालला ?
गतकालाचा मग का जमणें
तर्क कुणाला कधी चिंतनें
अथवा कळणें थांबणें कधी
पिशी तमिस्त्रा स्वकार्यामधी

—'पिशी' परी का तिला म्हणावे ?
बुद्धिहीन जन का न गणावे ?
या, लव लक्षूं गत इतिहासा
बघूं कुणाचा हुकमी फासा
मानाचीं ज्या नंतर दानें
अप्रबुद्ध ते आधि भासणें
प्रारंभींचे खुळे शेवटीं
मान्य अलौकिक जगतीं ठरती
आर्किमिडिज पथिं विवस्त्र धावे
त्यागी गौतम राज्य-वैभवें
बाल्यि शिकंदर अश्रू ढाळी
कोलंबस तो नौका ढकली
थिजनिं ओरडे डेमॉस्थेनिस
पर्णें जमवी डार्विन निरलस
आज वाचनें साक्रेटिसचीं
गॅलिलिओला जनता जाची
अशा दाखवूं कितीक व्यक्ती
वरचढ पटतां गातो महति
कवि एखादा कागद फाडी
चित्रकार कुणि रेघा ओढी
पतंग कोणी उडवित राही
वाफ निसटती कोणी पाही
आमुच्यांतला खेळ हा खुळा
दोष वृथा का मग रजनीला ?
कार्य साधणें असेल कांही
ज्याच्यासाठी येत जात ही
ध्येयप्राप्ति नच वेड न जडतां
प्रगति खुंटते पिसें न भरतां
वेड सपद्धत जेथे दिसतें
तिथे पडावीं पुष्पें हस्तें
ओथंबावे तेथे लोचन
भावसुमांचें व्हावें विकसन
हेंच शिकविलें अजवर काळें
पटवुनि घेणें केवळ उरलें
तोंवर थांबो जग हें रजनी !
निंदो तुजला नच अज्ञानीं !

—दत्तात्रेय चिंतामण सोमण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अन्धःकार भरे—

★ पुण्याचे मनोहर शिरवाडकर हे सुप्रसिद्ध कविवर्य ‘ कुसुमाग्रज ’ यांचे बंधु. त्यांचें हें सुनीत हृदयंगम आहे.

अन्धःकार भरे निशीथसमयीं माझ्या सभोंती, मनीं
गाती रातकिडे लपूनि तिमिरीं रात्रीस ते आरती
भूकेलीं मम बालकें दिनभरीं आक्रंदुनी घोरती !
का दैवा भरडून जीव इवले विक्राळ घेशी रणीं ?
उन्मत्ता हिमलाटही फिरतसे गेहांत चोंहीकडे !
देहा आवरुनी सखी पडतसे थंडींत कापे परी
बाहूंची मम ऊब ही कुठवरी रोधील वायू-सरी !
मातीचा टिकणार बान्ध कधिही का सागराच्यापुढे ?
खोटें हास्य दिनीं मुखावर परी रात्रीं तुझीं आसवें
गालीं ओघळती-विषाद जणु वा येई कपोलावरी !
रत्नांची बघुनी दशा प्रिय तुझ्या व्याकूळशी अंतरीं
निष्पापी असतील जीव मजला शापीत श्वासासवे !
प्रातःकाल गिळील रात्र, सविता टाकील भू व्यापुनी
माझी जीवनरात भीषणतरा होई परंतू दिनीं ! !

—मनोहर शिरवाडकर

●

कमळण

★ मुंबईचे प्रा. रेगे यांचा हा चुटका त्यांच्या ‘ खास ’ शैलीला अनुसरून असाच आहे.

आळसावलेले डोळे
उगाच केलेस मोठे
त्यांत जाइन मावून मी
वाटलं का ग पोरटे ?

ओठ टेकले पापणीवर
म्हणून का हा इंगा ?
कमळण ऐसी दरदी
अटकवलाही भुंगा

रागोत्राचे डोळे...
ओहो केवढे मोठे
त्यांत असाच मावून मी
राहिन का ग चोरटे ?

—पुरुषोत्तम शिवराम रेगे

●

साक्षात्कार

● यवतमाळचे कवि ना. ना. हूड यांच्या या सुंदर कवितेंत जनसेवेचें महत्त्व सूचकतेने सांगितलें आहे.

घालोनिया टपोरशी – रुद्राक्षांची माळ गळां
मुद्रा लावुनिया मुखा– केल्या किती नाना कळा !
चालविलें मूर्तीपुढे – किती अंगारे-धुपारे
तशी केली रात्रंदिन – पूजा षोडशोपचारें
चालविलें जपजाप्य – वाहियलीं फुलें-पत्रीं
वाटे मिळेल तयाने – देव अत्री-परत्रीं
तिच्या नांवाचेंच केलें – कोटी वेळ पारायण
तिजभोंती ओवाळिले – डोळियांचें नीरांजन
तिला न्हाणिलें करोनी– उष्णाश्रूंचें मीं सिंचन
होतें–नव्हतें तें केलें – माझें तिला समर्पण !
मंदिराचें महाद्वार – केलीं कवाडें बंदिस्त
डोळे मिटून घेतले –आणि बैसलों ध्यानस्थ
वर्षांमागूनीया वर्षें – आलीं आणि तैशीं गेलीं
हालचाल मूर्तीत न – तसूभर कधी झाली !
पाषाणाचा मूर्तिदेह – तसें मनही पाषाण
अखेरचें कळों आलें – झालें व्यथित मन्मन !
कंटाळून त्रासूनही – आणि अतीव; रोषांत
फोडुनीया महाद्वार – आलों मोकळ्या विश्वांत
साक्षात्कार तोंच झाला–घडे विराट दर्शन
उभा समोरच होता – दारिद्र्याचा नारायण !

—नारायण नागोराव हूड

● ● ●

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पांडुरंग श्रावण गोरे

नारायण नागोराव हूड,
बी.ए., एल्.एल्.बी.

● यवतमाळचे सत्कवि पां. श्रा. गोरे यांचा चटकदार परिचय त्यांचे यवतमाळचे कविमित्र रा. हूड यांनी या लेखांत करून दिला आहे.

* * *

पांडुरंग श्रावण गोरे यांच्या 'गोरे' या नांवावरून ते कोकणस्थ ब्राम्हण आहेत काय, असें एखाद्यास वाटेल. पण गोरे यांचा जन्म एका खानदानी मराठा कुळांत झाला आहे. ते १९०५ मध्यें जन्मास आले व त्यांचें सारें शिक्षण यवतमाळ येथें झालें. गोरे यांना लहानपणापासून वाङ्मयाची गोडी असल्यामुळे अभ्यासाकडे त्यांचें बिलकूल लक्ष्य नव्हतें ! एकदा तर स्वारी ऐन वार्षिक परीक्षेत 'भावबंधन' नाटक वाचीत बसली होती ! या अनास्थेचा परिणाम शिक्षण अपुरें राहण्याखेरीज दुसरा काय होणार ? गोरे यांनी गांधीजींच्या असहकारितेच्या चळवळीचें निमित्त करून शाळेला 'रामराम' ठोकला ! यामुळे ते पुरते मॅट्रिकहि होऊं शकले नाहीत !

गोऱ्यांचा जन्म खानदानी मराठा कुळांत झालेला असला, तथापि त्यांची आर्थिक परिस्थिति चांगलीशी नव्हती. अर्थात् त्यांचा सर्वच जन्म परिस्थितीशीं झगडण्यांत जात आहे ! स्वभाव उदार असल्यामुळे एका मित्राची त्यांनी जामीन घेतली आणि त्या प्रकरणांत त्यांची जमीन गेली, एवढेंच नव्हे, तर त्यांना दिवाणी तुरुंगाची हवाहि खावी लागली ! शाहिरी वाङ्मयाचा गाढ अभ्यास असणाऱ्या गोऱ्यांना अनंतफंदीचा 'जामिन कोणा देउं नको ! '–हा उपदेश माहीत नव्हता, असें नव्हे ! पण उदार स्वभावापुढे या उपदेशाचा काय पाड लागणार ? यवतमाळजवळ 'निळोणें' नांवाचें सुंदर खेडें आहे, तेथे गोऱ्यांची ही जमीन होती. याच गांवीं त्यांचें घरहि होतें. तें मध्यंतरीं अग्नीच्या भक्ष्यस्थानीं पडून भस्मसात् झालें आणि पोटाला चिमटा देऊन जमविलेला त्यांचा ग्रंथसंग्रह त्या आगींत सपशेल जळाला ! याच सुमारास त्यांच्याजवळ जें काय सोनें–नाणें होतें, तें चोरीला गेलें आणि या सर्व दुःखांचा कडेलोट म्हणून की काय, त्यांची प्रथम पत्नी मृत्युमुखीं पडली !–ही सर्व अनर्थपरंपरा गोरे खंबीर मनाने सहन करीत होते, हीच त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होती!

१९२१ मध्ये शाळा सोडल्यानंतर चांदूर तालुक्यांतील पिंपळखुटा येथें राष्ट्रीय शाळेमध्ये त्यांनी निर्वेतन शिक्षकाचा व्यवसाय तीन–चार वर्षें केला. त्यानंतर ते निळोणें येथे आपली शेती स्वतःच करीत होते. शेतांत नांगर चालविण्यापासून तों त्यांत रात्रीं राखणीला जाण्यापर्यंत सर्व कामें ते जातीनें करीत असत. कांही काळ तर त्यांना साधु बनण्याचीहि लहर आली होती ! दाढी–मिशा व जटा वाढविलेल्या आहेत आणि कपाळाला कुंकवाचा मळवट भरलेला आहे—अशा थाटांतील गोरे रोज संध्याकाळीं खेडुतांपुढे प्रवचनें करीत ! त्यांना वक्तृत्वाची देणगी उपजतच असल्यामुळे त्यांचीं हीं प्रवचनें फार परिणामकारक वठत असत. वक्तृत्वाच्या या गुणामुळेच गोरे यांनी निवडणुकींत व्याख्यानांचे दौरे काढले होते ! खादीचे पांढरे कपडे घालून ते कांही काळ याप्रमाणें प्रचारकहि बनले होते ! यवतमाळास मराठा विद्यार्थ्यांसाठी बोर्डिंग चालविण्याचा उद्योगहि त्यांनी केला होता !

गोरे यांच्या या अनिश्चित व बदलत्या जीवनक्रमाला कालांतराने स्थैर्य आलें. यवतमाळ-जिल्हा-कौंसिलांत नोकरी मिळाल्यापासून ते आता ठरीव जीवनक्रम घालवूं लागले आहेत. सध्या ते शाळा व कोंडवाडे यांच्या इन्स्पेक्टरचें काम करीत आहेत.

प्रथम पत्नी निवर्तल्यानंतर त्यांनी दुसरें लग्न केलें. त्यांचा संसार गरिबीचा, पण सुखी आहे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गोरे यांच्या आयुष्यांतील या स्थित्यंतरांत एक गोष्ट 'स्थिर' होती, ती त्यांचें वाङ्मयप्रेम. कितीहि संकटें येवोत, त्यांच्या वाङ्मयप्रेमांत माल कधी फरक पडला नाही! जुनें ओवी-अभंगाचें संतवाङ्मय किंवा लावण्या-पोवाड्यांचें शाहिरी वाङ्मय यांचा नित्यव्यासंग ते करीत असत. या व्यासंगाचा परिणाम गोरे यांच्या भाषेवर झालेला आहे. या वाङ्मयांतील उत्तमोत्तम शब्द व वाक्प्रचार त्यांच्या कवितेंत अगदी सहज येऊन जातात. पण गोरे यांची भाषा केवळ 'पुस्तकी' नाही. समाजांत मिसळल्यामुळे अडाणी पुरुष व स्त्रिया यांच्या बोलण्यांतील अस्सल मराठी शब्द व वाक्प्रचार यांचा गोरे यांनी सूक्ष्म परिचय करून घेतलेला आहे आणि त्यांचा ते आपल्या लेखनांत साक्षेपानें उपयोग करून घेत असतात. वऱ्हाडी बोलींतील अपभ्रष्ट किंवा असुंदर भाग वगळून तींतील शुद्ध व सुंदर भाग कवितेंत आणणें हा गोरे यांचा एक विशेष होय.

गोरे यांचे 'बोवडे बोल' व 'वाणीचा हुरडा' हे दोन काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांतील कवितांत विषय व वृत्त यांचें भरपूर वैचित्र्य आलेलें आहे. शाहिरी बाण्याची कविता, राधा-कृष्ण-पर गीतें, आत्मपर काव्यें-अशी विविध प्रकारची रचना गोरे यांनी केली आहे. क्वचित् त्यांनी गूढगुंजनहि केलेलें आहे! ('सांजवात' पहा) परंतु गोरे यांचें खरें वैशिष्ट्य या कवितांत नाही, तर ते त्यांच्या **जानपद कवितांत** उमटलें आहे. खेड्यापाड्यांतील शेतकरी व कामकरी स्त्री-पुरुष यांचीं सुख-दुःखें गोरे यांनी आपल्या कवितांतून तन्मयतेने रेखाटलीं आहेत, हें त्यांच्या कवितेचें वैशिष्ट्य होय. राजकवि यशवंत यांच्या 'मैतरणी बिगि बिगि चाल' या कवितेमुळें कांही काल जानपद कवितांचें आपल्याकडे पेवच फुटलें होतें! पण प्रत्यक्ष अनुभूतीच्या अभावीं हीं सर्व जानपद काव्यें केवळ नकलीं उतरलीं! मागे सांगितल्याप्रमाणें गोरे यांनी शेतकऱ्याचें जीवन स्वतः कंठिलेलें आहे. त्याचप्रमाणें, खेड्यापाड्यांतील लोकांशीं ते समरस झालेले आहेत. या कारणामुळे गोरे यांचीं जानपद काव्यें जिव्हाळ्याने भरलेलीं व सरस उतरलीं आहेत. 'वाणीचा हुरडा' या त्यांच्या दुसऱ्या काव्यसंग्रहांत अशीं गीतें विपुल आलेलीं आहेत. 'देवाला आली दया', 'दाद', 'पाटीचें गाणें', 'हा सगर नदीवर', 'पाटलाची पोर', 'खेड्यांतील सत्कार'-वगैरे कविता या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. भाषेचा उमदेपणा व रेखीव वर्णन या गुणांत 'पाटलाची पोर' ही कविता अप्रतीम ठरते. तिच्यांतील गाडीचें वर्णन पहा—

गोऱ्हे अरकाट। मुटले सरनाट
नवे दमदार
पाठीवर झूल। रंगित मखतूल
वर कलाकुसर
करिति गळ्यांतील। सैल कशा झील
टिणमिण्या गजर

गाडींत बसलेल्या पाटलाच्या पोरीचें वर्णन पहा—

लेक घरंदाज। अंगावर साज
उमलता बहर
पिवळि नखवोटीं। नाजुक शेलाटी
पोर गुलजार
रत्नाची वाटी। सोन्याच्या ताटीं
कुण्या पडणार?

अस्सल मराठी भाषा लिहिण्यांत गोऱ्यांचा हात खंडा आहे, याची साक्ष वरील अवतरणांवरूनहि पटेल!

तात्पर्य, खेडुतांचीं सुख-दुःखें सरसतेने वर्णन करणारे कवि म्हणून गोरे यांना मराठी वाङ्मयांत विशिष्ट स्थान प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. विदर्भांत 'लोककवि' असे ज्याला यथार्थत्वाने म्हणतां येईल असे गोरे हे एकटेच कवि आहेत.

गोरे यांनी 'कवि' म्हणून जशी कीर्ति मिळविली आहे, तशीच 'संशोधक' म्हणूनहि कीर्ति प्राप्त करून घेतली आहे. खेड्यापाड्यांत भटकून त्यांनी अत्यंत श्रमाने लोकगीतें जमविलीं, तीं 'वऱ्हाडी लोकगीतें' या नांवाने प्रसिद्ध झालीं आहेत. हीं लोकगीतें उजेडांत आणून गोरे यांनी एक महान् वाङ्मयकार्य केलेलें आहे. नागपूर

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत १९२३
विदर्भ साहित्य संघ

युनिव्हर्सिटीने हें पुस्तक बी. ए. ला नेमून आपली गुणग्राहकता व्यक्त केली आहे.

अलीकडे गोरे यांनी 'कात टाकलेली नागीण' या नांवाची ग्रामीण जीवनावर आधारलेली कादंबरी लिहून पुरी केली आहे. ती प्रसिद्ध होण्याचा योग केव्हा येईल तो येवो!

गोरे हे 'कवि' म्हणून चांगले आहेत, हें तर खरेंच; पण ते 'व्यक्ति' म्हणून त्याहूनहि जास्त चांगले आहेत. ते जितके विनयशील तितकेच स्वाभिमानीहि आहेत. ते मराठा असूनहि त्यांच्यांत जातीयतेचा लवलेश नाही. सारें आयुष्य धकाधकींत चाललें आहे, पण त्यांच्या मनाचा खंबीरपणा अढळ आहे! प्रसिद्धीपासून तर ते नेहमीच चार पावलें दूर पळतात. यामुळे त्यांनी यापूर्वी कधीहि मासिकांत कविता प्रसिद्धीसाठी पाठविली नाही! 'युगवाणी'चे संपादक वा. ना. देशपांडे त्यांचे बालमित्र असल्यामुळे ते त्यांच्या कविता जबरदस्तीने 'युगवाणी'त छापतात, हाच काय तो अपवाद होय! अशा या अत्यंत गुणी कवीची मराठा समाजाने मुळीच बूज करूं नये, हा केवळ दैव-दुर्विलास होय! स्वतः गोरे यांची कुणापासून कांहीच अपेक्षा नसली, तथापि त्यांना आता तरी स्वास्थ्य प्राप्त व्हावें, असें माझ्यासारख्या त्यांच्या मित्रास फार वाटतें. तसें झाल्यास गोरे यांस उरलेलें आयुष्य निर्वेधपणें वाङ्मयास वाहतां येईल!

• • •

दोन राजर्षि—

२ माधवराव सिंदे

रा. ब. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

● रियासतकार नानासाहेब सरदेसाई यांनी लिहिलेला कै. सयाजीराव महाराज गायकवाड यांचा परिचय गेल्या अंकीं दिलेला आहे. चालू अंकीं कै. माधवराव महाराज सिंदे यांचा परिचय देण्यांत येत आहे.

माधवराव सिंद्यांचा हा परिचय सयाजीराव गायकवाडांच्या परिचयापेक्षाहि सरस उतरला आहे, असेंच कुणीहि म्हणेल. याला कारण, अर्थातच, माधवरावांचें विशिष्ट व्यक्तिमत्व होय!

* * *

स. १८५७ सालच्या प्रचंड क्षोभामुळे हिंदुस्थानच्या इंग्रजी राजकारणांत नवीन मन्वंतर सुरू झालें. इंदूरचे तुकोजीराव होळकर, बडोद्याचे खंडेराव गायकवाड व ग्वाल्हेरचे जयाजीराव सिंदे या तीन प्रबल मराठे संस्थानिकांच्या साहाय्यामुळे इंग्रजांचें राज्य त्या भीषण प्रसंगांतून सुरक्षित पार पडलें. त्या आणीबाणीच्या प्रसंगीं या तिघांचीं खूप खलबतें झालीं. बंडवाल्यांनी तिघांनाहि आपल्या बाजूस ओढण्याची शिकस्त केली, पण या तिघांचा मिलाफ इंग्रजांनी होऊं दिला नाही. मुख्यत: जयाजीराव सिंदे व त्यांचे दिवाण रावराजे दिनकरराव राजवाडे यांनी निश्चयाने इंग्रजांना आधार दिला. तेव्हापासून जयाजीराव सिंदे व तुकोजीराव होळकर ही जोडी कांही काळ हिंदुस्थानच्या नवीन परिस्थितींत प्रमुखपण पावली, तशी त्यापुढील काळांत सयाजीराव गायकवाड व माधवराव सिंदे हेहि आपापल्यापरी नामांकित बनले.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माधवराव हे जयाजीरावांचे चिरंजीव. यांचा जन्म स. १८७६ सालीं झाला. सिंद्यांच्या कुटुंबांत पूर्वीच्या तीन पिढ्या दत्तक झाल्यावर माधवराव हे पहिलेच औरसपुत्र निपजल्यामुळे त्यांचा जन्मोत्सव मोठ्या थाटाचा झाला. त्यांचे वडील जयाजीराव तन्हेवाईक व कुर्रेबाज होते. अंगीं विद्वत्ता किंवा शहाणपण फारसें नव्हतें, तरी इंग्रजांच्या मेहेरबानीने त्यांना कांहीं उणें पडलें नाहीं. राज्यांत कोणी विद्वान् अंमलदार त्यांनी हाताशीं न घेतल्यामुळे सुधारणा न होतां अव्यवस्थाच माजली! माधवरावांच्या विद्याभ्यासाची तर्तूद वडिलांनी कांहींच केली नाहीं. माधवराव नऊ वर्षांचे झाल्यावर स. १८८६ सालीं जयाजीराव वारले, त्यानंतर इंग्रजांनी आपणाला योग्य वाटेल तशी माधवरावांच्या शिक्षणाची सोय करून दिली. जॉन्स्टन् नांवाचा इंग्रज गृहस्थ त्यांचा शिक्षक होता. बडोद्यांत सयाजीरावांच्या अप्रौढ कालांत सर माधवराव या दिवाणांनी जशी राज्यकारभाराची नवीन घडी बसवून दिली, तसा प्रकार ग्वाल्हेरचा झाला नाहीं. वयाचीं अठरा वर्षे झाल्यावर स. १८९४ सालीं माधवरावांच्या हातीं मुखत्यारी आली. त्यानंतर संस्थानांत नवीन व्यवस्थेचा आरंभ झाला. सयाजीराव व माधवराव या दोघांच्या स्वभावभेदामुळे या दोन प्रमुख संस्थानांच्या कारभारास निराळें स्वरूप प्राप्त होत गेलें.

माधवरावांनी जन्मांत कधी नियमितपणें पुस्तकी अभ्यास म्हणून केलाच नाहीं, किंवा सयाजीरावांप्रमाणें त्या बाबतींत परिश्रम व विद्वत्समागम यांची परवा ठेविली नाहीं! त्यांचा स्वभाव उच्छृंखल व हेकेखोर होता. एका जागीं बसून लिहिण्यावाचण्याचा त्यांना भारी तिटकारा वाटे! घोडे, शिकार, खेळ, यंत्रें—अशांत त्यांचें मन सदा रमे. आगगाडीचा शोक त्यांना भारी वाटत असून एक लहानसें आगगाडीचें यंत्र त्यांना खेळण्यासाठी दिलें होतें. तें उलगडून बसविण्याचा नाद त्यांना इतका लागला की, त्यासाठी अर्धा मैल लांबीची एक लहानशी सडक राजवाड्याजवळ त्यांनी बनविली आणि तिच्यावर ते एंजिन व गाडी स्वतः चालवूं लागले! सुतारकाम, लोहारकाम इत्यादि अनेक व्यवसाय त्यांनी स्वहस्ताने सारखे कैक वर्षे चालविले. मोटार नादुरुस्त झाली तर रस्त्यांतल्या धुळींत यंत्राखाली तासन्तास पडून ती ते स्वतः नीट करीत! कोठे प्रवासांत असले तर आगगाडीच्या एंजिनांत उडी मारून ड्रायव्हरचें काम करतांना त्यांना पुष्कळांनी पाहिलें आहे! पण वाचनाने ज्ञानप्राप्ति केल्याशिवाय नुसत्या हस्तक्रियेवर व्यवहार भागत नाहीं, हेंच मोठें वैगुण्य माधवराव सिंद्यांचें एकंदर कारभारांत अखेरपावेतों कायम राहिलें! सयाजीरावांची उच्चता त्यांना लाभली नाहीं!

परंतु माधवरावांचें अंतःकरण मात्र जास्त प्रेमळ व विकारवश होतें. कोणाशींहि मैत्री किंवा सलगी करण्यास ते कचरत नसत. दुसऱ्याच्या सुखदुःखांत ते तात्काळ समरस होत. बोलणें किंवा लिहिणें मोठेसें शुद्ध नाहीं, पण सरळ व निष्कृत्रिम भाषणाने ते बाहेरच्यांवर आपली छाप तेव्हांच बसवीत. इंग्रजी राज्यांचा त्यांना प्रथम मोठा अभिमान वाटत असे. इंग्रज सम्राटाचे ते सन्मान्य ए. डी. सी. होत. वडिलांनी तीन सूत्रें राज्यकारभारांत प्रमुख मानलीं होतीं, तींच माधवरावांनी पुढे चालविलीं. पैशाचा संचय, सेनेची सिद्धता व इंग्रजांचा संतोष—या तीन गोष्टींस जपलें, म्हणजे पुरें, इतर बाबतींची विचक्षणा करण्याचें आपणांस प्रयोजन नाहीं, हाच वडिलांचा दंडक माधवरावांनीहि पुढे चालविला. आफ्रिकेंत बोअर युद्ध चालू झालें, चीनांत बॉक्सर मोहीम निघाली, युरोपांत पहिलें महायुद्ध ओढवलें, अशा अनेक प्रसंगीं माधवरावांनी धडाडीने पुढाकार घेऊन असें आश्वासन जाहीर केलें की, "माझें सर्व सैन्य, राज्य व जीवित साम्राज्यसरकारच्या सेवेंत वेचण्यास मी सदा तत्पर आहे!" साम्राज्याच्या उपयोगासाठी संस्थानिकांनी स्वखर्चाने जादा सैन्य द्यावें, अशी मागणी इंग्रजांनी करतांच ती माधवरावांनी दरएक प्रसंगीं पुरी करून दाखविली. स्वतः ते चीनच्या मोहिमेस गेले. 'लॉयल्टी' म्हणजे 'राजनिष्ठा' नांवाची औषधोपचाराची मोठी बोट स्वखर्चाने बांधून ती इंग्रजांच्या साहा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

त्यास दिली. स. १९११ सालीं जॉर्ज बादशहांच्या राज्यारोहणसमारंभास हजर राहून लंडनच्या मिरवणुकींत माधवरावांनी ए. डी. सी. चें काम केलें. सयाजीराव असल्या प्रकारांपासून चार पावलें दूर राहत!

चलाख बुद्धि, अपरंपार मेहनत व भरपूर कर्तव्यनिष्ठा या गुणांत माधवराव सिंदे सयाजीरावांहून कदाचित् वरचढ म्हणतां येतील. पण त्या गुणांस विद्येची जोड नसल्यामुळे बाह्यजगाच्या व्यवहारांची व्यापक दृष्टी कधी आली नाही! लोकशाहीच्या कारभाराची ते उघडउघड थट्टा करीत. ' हिंदी राष्ट्र ' म्हणून कांहीं चीज आहे, त्यांत आपलें स्थान काय, त्यासाठी आपण काय केलें पाहिजे, या राष्ट्राचें भवितव्य काय-असले थोर विचार माधवरावांनी कधी मनांत आणिले नाहीत. इतकें करूनहि आपल्या राज्याच्या हितास व हक्कांस सार्वभौम सरकाराकडून वारंवार विरोध होऊं लागला, तेव्हा मानवी जीवनाची उमज पडून इंग्रज राज्यकर्त्यांबद्दलचा त्यांचा आदर उत्तरोत्तर ओसरत गेला.!

माधवरावांची अशी ठाम समजूत होती की, लोक उगाच विद्येचा व ज्ञानाचा विलक्षण बाऊ करून दाखवितात! आपण आपल्या बुद्धीने व अनुभवाने पाहिजे तो विषय यशस्वी करून दाखवूं. पण मानवी व्यवहार अशा जवळच्या तात्कालिक वाटेने कधीच पल्ल्यास पोंचत नसतात! सयाजीरावांनी वर्षानुवर्षें खपून गिब्बनच्या प्रतिष्ठित इतिहासाचा अभ्यास केला आणि त्यांतील विशिष्ट मुद्यांचीं स्मरणीय टिपणें काढून त्यांचें स्वतंत्र पुस्तक[१] प्रसिद्ध केलें, तर माधवरावांनी अंगच्या अनुमानधपक्यावर "दरबार-पॉलिसी" नांवाचे प्रचंड बारा भाग छापून एक प्रकारची प्रौढी संपादिली. पण आज त्या ग्रंथांचा कांहीं एक उपयोग न घडतां ते धूळ खात पडले आहेत!

मानवी जीवन ही एक अजब कसरत आहे. या कसरतींत प्रत्येकाने आपापल्या स्थानाचा तोल संभाळून प्रेक्षकांची वाहवा मिळविली पाहिजे. हा तोल माधवराव सिंद्यांस सांभाळतां आला नाही! प्रत्येक काम तावडतोब सिद्धीस नेण्याच्या प्रयत्नांत त्यांची फसगत होई! यशःसिद्धीचा मार्ग संथपणाच्या कष्टांनी चोखाळावा लागतो, त्यास जवळची आखूड वाट नसते. वृक्ष तयार होऊन फळें येण्यास अवधि पाहिजे, हा धोपट कित्ता माधवरावांस मानवला नाही! अंतःकरणाच्या कळवळ्याने ते लोकांचीं मनें आकर्षून घेत, पण त्यास टिकाऊ स्वरूप आलें नाही. झीज सोसून कष्ट अतोनात करीत, बुद्धींत भेदभाव बिलकूल नव्हता, हिंदुमुसलमानांच्या दुहीचा प्रश्नच त्यांच्या राजवटींत निघाला नाही. मुसलमान सरदारांच्या संगतींत ते गणपतीचा उत्सव अगत्याने साजरा करीत, तसेंच हिंदु सरदारांसह मोहोरमच्या मिरवणुकींत ते आनंदाने सामील होत.

खुद्द राज्यकारभारांतहि माधवरावांनी व्यवहारांतला धोपट मार्ग सोडून त्वरित परिणामाचा आपला आग्रह चालविण्यास कमी केलें नाही; आणि कित्येकदा त्यांना यशहि मिळत गेलें, हें कांहीं खोटें नव्हे! एकदा त्यांच्या एका प्रांतांत सारखे दरवडे चालू होऊन कांहीं केल्या बंदोबस्त होईना! पोलिस थकून गेले. दरवडेखोरांस मोठमोठे जमीनदार सामील होते. सर्वांनी मिळून हा एक प्रकारचा धंदाच उघडउघड चालविला! लष्करी फौज आणून तोफांनी गांवेंच्यागांवें उधळून दिल्याशिवाय भागत नाही, अशी स्थिति येऊन ठेपली! त्यांतून दुसऱ्या संस्थानिकांच्या व इंग्रजी राज्याच्या हद्दींची गुंतागुंत असल्यामुळे नुसत्या कायदेबाजीने व्यवहार उलगडेना. अशा स्थितींत महाराजांनी स्वतःचा उपाय अंमलांत आणिला. आगाऊ एक महिना सर्व लोकांना जाहीरनामा काढून कळविलें की, अमुक दिवशीं आम्ही स्वतः गांवावर येऊन गुन्हेगारांचा निकाल लावूं, त्यावेळीं सर्व जमीनदारांनी गुन्हेगारांसह हजर राहावें! न हजर राहिल्यास भयंकर परिणाम भोगावे लागतील!

आदल्या दिवशीं सायंकाळीं महाराज एकटे आपल्या मोटारींतून त्या स्थळीं हजर झाले. हजार पांचशेंचा जमाव जमला होता. सकाळीं महाराज

१ ' From the Cross to the Crescent. '

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एकटे निर्धास्तपणें त्या जमावांत गेले. सर्वांपुढे तासभर त्यांनी प्रेमळपणानें जोराचें भाषण केलें. " गुन्हेगार कोण असतील ते पुढे या. तुम्हीच त्यांचा न्याय करा व शिक्षा ठरवा! तुमची बंडाळी तुम्ही मोडा. तुम्ही ठरवाल त्या शिक्षा आम्ही अंमलांत आणूं! मात्र निकाल केल्याशिवाय आज आम्ही येथून हालणार नाही!" एवढें ऐकल्यावर प्रतिष्ठित जमीनदार होते त्यांनी गुन्हेगारांस पुढे आणलें! लोकांनी भराभर कबुल्या दिल्या, माल होता तो हजर केला! पुढारी होते त्यांनी शिक्षा ठरविल्या! एक यादी गुन्हेगारांच्या नांवांची तयार करण्यांत आली! सर्वांसमक्ष महाराजांनीं त्या शिक्षांस मंजुरी दिली! चार-दोन तासांत सर्व काम उरकून लोकांत आनंदीआनंद पसरला! पोलिसतपास, गोळीबार, न्याय, कोर्टें, वकील-अशा यातायाती कांही एक न होतां प्रकरणाचा निकाल तावडतोब लागला!!

असा हा महाराजांचा कारभार सरळ व निष्कपट होता. अंतःकरणांत प्रेमाचा ओलावा भरपूर, म्हणून अशा माणुसकीवर त्यांचा कारभार निभावला. सर्वांशीं समभावानें व निष्कपट भावानें ते वागत, म्हणून त्यांजवर प्रजेची निष्ठा भरपूर जडली. सयाजीरावांचा कारभार रेखीव व नियमबद्ध, मनाचा थांग कधी कोणास लागायचा नाही. त्याच्या उलट प्रकार माधवरावांचा! मला कोणीहि हसवावें, अशी पैज सयाजीरावांनी लावली व जिंकली. त्याच्या उलट माधवराव हसतखेळत लोकांच्या गर्दीत शिरत. एखाद्या गरीबाच्या झोपडींत जाऊन तव्यावर भाजली जाणारी भाकरी मागून ते आनंदानें खात! रस्त्यावर चुकलेलें मूल उचलून प्रेमानें त्यास घरीं पोंचवीत! माणसाचे ते भुकेलेले असत. जेवणाखाणांत थट्टामस्करी अतोनात चाले. सयाजीरावांचें वातावरण गंभीर व न्यायनिष्ठुर असे. एक गरीबींत जन्मलेला सामान्य मुलगा, तर दुसरा ऐश्वर्यांत निपजलेला राजपुत्र-यांचें स्वभाव-वैचित्र्य पाहून कोणास मौज वाटणार नाही?

माधवरावांच्या अंतःकरणांत मातृभक्तीचा उमाळा सदैव जागृत होता. नवऱ्याची चवथी बायको केवळ मुलगा व्हावा म्हणून केलेली. चौदाव्या वर्षी तिला हा मुलगा झाला, आणि पुढें लवकरच वैधव्य प्राप्त झालें. विद्या वगैरे फारशी नव्हतीच, पण सर्व प्राण मात्र मुलावर. मुलानेहि तिची सेवा उत्कृष्ट बजावली. विद्येचें अमृतपान मातेकडून मुलास मिळूं शकलें नाही. सन १९१९ सालीं ही मातुःश्री बारल्यावर माधवरावांचें जिणें उद्विग्न व अंधारमय बनलें! उत्तरोत्तर मधुमेहाचा विकार जडून त्यांचें मूळचें भक्कम शरीर निःसत्त्व बनत गेलें. वाह्य घडामोडींची परवा त्यांनी कधी ठेविली नाही! 'मी करीन तें चांगलेंच करीन'-अशा भावनेंत त्यांनी शिक्षण, उद्योगधंदे, आगगाड्या इत्यादि लोकोपयोगी अनेक कामें सिद्धीस नेलीं. राज्याकरिता त्यांनी अतोनात कष्ट केले. अंमलदारांनी विरोध केलेला त्यांस कधी खपत नसे. सार्वभौम सरकारासाठी वाटेल तो स्वार्थत्याग त्यांनी सहन केला. पण इंग्रजांचा कारभार सदा मतलबी असल्यामुळे अल्प बाबतींत सुद्धा त्यांनी महाराजांस वारंवार नाखूष केलें! तेव्हा सार्वभौम सरकारावरची त्यांची भक्ति उडाली! महत्त्वाच्या प्रकरणांतहि आपणांस इंग्रजांकडून न्याय मिळत नाही, उलट निष्कारण कालहरण करून आपल्या हितास व हक्कांस ते बाध आणितात, अशी त्यांची खात्री पटली! तेणेंकरून शेवटीं ते अत्यंत निराश व उद्विग्न बनले! प्रकृति ढासळत चालली, तसें त्यांचें कामहि मंदावलें!

पण स्वतःच्या प्रकृतीचा तर त्यांनी सर्वच खेळखंडोबा करून घेतला! डॉक्टरांचें ऐकायचें नाही, औषध घ्यायचें नाही, ही वृत्ति मातुःश्रीच्या निधनोत्तर दृढावत गेली. त्यांस आळा घालणार कोणी नव्हतें. त्यांना वाटे, हे डॉक्टर उगाच रोगाचा बाऊ करून दाखवितात! मलाच रोगाचें निदान जास्त कळतें! घटकेंत वैद्य, घटकेंत हकीम, घटकेंत सर्व एकदम, असें करतांना प्रकृति फारच खालावली, तेव्हा अनेकांच्या आग्रहावरून व बादशहांच्या बोलावण्यावरून ते स. १९२५ सालीं विश्रांतिसाठी म्हणून युरोपास गेले! पाठीस गळूं झालें होतें, तें प्रवासांत वाढत गेलें, पण शस्त्रक्रिया करून घेण्यास तें कबूल होईनात! पॅरिस येथे

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पोचतांच त्यांस सयाजीराव भेटले. त्यांनीं नानाप्रकारें त्यांची समजूत घातली. तेव्हा शस्त्रक्रिया करण्यांत आली. पुष्कळ बरें वाटूं लागलें. पण थोड्या दिवसांनंतर ते जखम धुऊं देइनात! ग्वाल्हेरच्या हकीमास त्यांनी तारेनें बोलाविलें होतें, ते दाखल होतांच त्यांनी हकीमाचें औषध चालू केलें. जखम तशीच चिघळत गेली! त्यांस चिरूट ओढण्याचा नाद होता. ता. ५ जून रोजीं तिसरे प्रहरीं हातांत चिरूट असतांच पॅरिस येथे त्यांचें प्राणोत्क्रमण झालें!

माधवराव सिंद्यांसारखे आरथेवाईक व कनवाळू राज्यकर्ते दुर्मिळ होत. ग्वाल्हेर राज्याची हल्लींची नानाविध प्रगति सर्वथैव माधवरावांनी बनविलेली आहे. ग्वाल्हेरचा पुराणप्रसिद्ध किल्ला व मुरारची छावणी इंग्रजांच्या कबजांत होती, ती यांनी सोडवून घेतली. बडोद्याच्या सयाजीरावांच्या कन्येशीं त्यांचा द्वितीय विवाह ठरला होता, पण तो सिद्धीस गेला नाही. माधवरावांनी पुढे दुसरा विवाह केला, त्या संबंधापासून सन १९१६ सालीं त्यांचे पुत्र जिवाजीराव जन्मले, ते हल्ली गादीवर विराजमान आहेत.

अशा रीतीनें अलीकडील मनूंतली या दोन मराठी संस्थानिकांची जोडी संस्मरणीय बनली. सयाजीराव माधवरावांच्या अगोदर चौदा वर्षें जन्मून त्यांच्या पश्चात् चौदा वर्षांनी मृत्यु पावले. पॅरिस येथे माधवरावांच्या मृत्युशय्येजवळ सयाजीराव हजर होते. सयाजीरावांचा अंत वार्धक्याच्या व कृतकृत्यतेच्या मानवी समाधानांत झाला, तर माधवराव शिंदे निराशेच्या कष्टमय वेदनांनी व्यथित होऊन पन्नाशीच्या आंत परदेशीं निजधामास गेले! दोघे आपापल्यापरी कर्तृत्ववान, जीवनक्रमांत अत्यंत भिन्न आणि जनतेचे हितकर्ते होते. सयाजीरावांची दृष्टि भावी हिंदी स्वराज्यावर खिळलेली होती, तर माधवरावांनी सार्वभौम सेवेंत आपल्या जीविताची सफलता मानली! दोघांनीहि आपल्या राष्ट्राचा अभिमान जागृत ठेवून सर्वोत्कृष्ट वाहवा मिळविली. अशा भिन्न-स्वभाव व्यक्तींची योग्यता ठरविणें जिज्ञासु अभ्यासकांचें काम आहे. तें करितांना उद्योगानें व कष्टानें पराक्रम गाजविणारे सयाजीराव आणि केवळ सदिच्छा व धाडस यांजवर भिस्त ठेवणारे माधवराव यांचीं ठळक उदाहरणें आधुनिक युगांत संस्मरणीय होत.

• • •

भावगीताचीं भावंडें.

प्राध्यापक–भ. श्री. पंडित
एम्. ए.

● प्रा. भ. श्री. पंडित यांनी या लेखांत भावगीताच्या 'चिंतनिका'–वगैरे भावंडांचा सोदाहरण परिचय करून दिलेला आहे, तो काव्याच्या अभ्यासकांस उपयुक्त वाटेल.

* * *

भावगीत हें ज्याप्रमाणें इंग्रजींतून मराठींत आलें आहे, त्याप्रमाणें चिंतनिका, उद्देशिका, विलापिका व औपरोधिका हे काव्यप्रकारहि इंग्रजीच्या द्वारें मराठींत शिरले आहेत. भावगीताप्रमाणेंच हे सर्व काव्यप्रकार व्यक्तिनिष्ठ (Subjective) आहेत आणि यांच्यांत देखील 'भाव'च प्रमुख आहे. मात्र भावगीताप्रमाणें हे काव्यप्रकार गेय नाहीत. आणि, जरी क्वचित् यांना गेयतेची जोड देण्यांत येत असली, तरी ती महत्त्वाची नाही. या काव्यप्रकारांत चिंतनपरता मनन-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शीलता व निदिध्यास यांची प्रचुरता असल्यामुळे साहजिकच भावगीताची लोकप्रियता यांच्या वाट्यास आलेली नाही.

चिंतनिका.

Reflective Lyric ' या इंग्रजी संज्ञेचा ' चिंतानिका ' हा मराठी पर्याय आहे. चिंतनिका लिहिणारा कवि हा विचाराच्या तंद्रींत गढलेला असतो. त्याची वृत्ति एकाद्या ध्यानमग्नाप्रमाणें असते. त्याच्या स्वप्नसमाधींतून चिंतनिकेचा संभव होतो. चिंतनिकेंत विचाराला महत्त्व असतें. परंतु हा विचार म्हणजे केवळ एकादें शुष्क तत्त्व नसतें. त्याच्या मूळाशींहि कवितेला निर्माण करणारी प्रेरक शक्ति असते आणि त्या विचारावर आधारलेली कविता ही इतर कवितांप्रमाणेंच सरस, सुंदर व सोज्वळ असते.

चिंतनिकेंत वाटेल तो विचार गोवतां येत नाही. तिच्यांत जो विचार गुंफावयाचा असतो, त्याचें सारभूत मूल्यमापन आवश्यक असतें आणि तें करतांना त्या विचारास काव्यमय स्वरूप देण्यांत व परिणामकारक करण्यांत कवीला कितपत यश प्राप्त झालें आहे, हें पाहावें लागतें.

चिंतानिका ही वाचकाच्या हृदयाला अप्रत्यक्ष आणि मेंदूला प्रत्यक्ष आवाहन करते. कारण तिची सुंदरता ही बव्हंशीं बुद्धिग्राह्य असते. ती अगोदर मेंदूस आकलन होते व नंतर हृदयास स्पर्श करते.

तत्त्वज्ञान, तर्क, युक्तिवाद किंवा उपदेश यांचाच जर चिंतनिकेंत खल असेल, तर तिचें स्वरूप रुक्ष व बोजड होईल. आणि, मग तिला ' काव्य ' ही संज्ञा प्रयुक्त करण्यापेक्षा ' पद्यबध्द विचार ' ही यथार्थ संज्ञा योजावी लागेल.

उपदेशपर पद्य आणि काव्यमय उपदेश यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. उपदेशपर पद्य हें इतकें कृत्रिम असतें की, तें वाचकाच्या मर्जीविरुद्ध त्याच्या मनावर कुरघोडी करीत असते. उलट काव्यमय उपदेश हा इतका स्वाभाविक असतो की, तो काव्याच्या ओघांत वाचकाच्या हृदयाची सहज पकड घेतो. उपदेशपर पद्य हें सहेतुक असतें. काव्यमय उपदेश हा निर्हेतुक असतो. ' जाईचीं फुलें ' व ' धरी रे ध्यानीं—जग अळवावरचें पाणी ' या माधवानुजांच्या गीतांतील उपदेश काव्यमय आहे.

तथाकथित उपदेशपर काव्यावर टीकाकारांचा जो कटाक्ष असतो, तो वास्तविक ' उपदेशा ' वर नसून त्यांतील ' काव्या 'च्या अभावावर असतो. त्यांत ' खरें काव्य ' नसून केवळ ' पद्यबद्ध उपदेश ' असतो, अशी त्यांची टीका असते. उपदेश काव्यमय कसा करावा हें जर कवीला कळलें, तर मग टीकाकाराला टीका करण्यास जागा राहणार नाही. परंतु कांही कवींना उपदेशांत ' काव्य ' ओततां येत नाही आणि त्यामुळे ते व त्यांचीं पद्यें हीं टीकाकारांच्या टीकेस एकाद्या सावजासारखीं बळीं पडतात.

क्वचित् कांही काव्यें नीति पाठ देण्याच्या उद्देशाने रचण्यांत येतात. तीं सहेतुक अस[illegible] हुधा एकाद्या कथेच्या झिरझिरित पडद्याआड त्यांची सजावट करण्यांत येते. त्यांचा अंतर्भाव कथा-काव्यांत करावा लागेल. परंतु ज्यावेळीं एकादी अमूर्त कल्पना ही मूर्त करतांना एकाद्या रूपकाचा अथवा प्रतीकाचा आश्रय घेण्यांत येत असेल व त्याच्या मध्यस्थीने विचार प्रकट करण्यांत येत असेल, त्यावेळीं मात्र त्या काव्यमय विचाराला चिंतनिकेंत प्रविष्ट करावें लागेल.

चिंतनिकेंत भावनेपेक्षा विचाराचा अंश अधिक असल्यामुळे ती भावगीताप्रमाणें तोकडी असावी, असा निर्बंध घालतां येणार नाही. टिळकांचें ' वनवासी फूल ' हें काव्य प्रदीर्घ आहे आणि ' अश्रुगुच्छ ' हें काव्य लघु आहे. पण या दोघांचाहि समावेश चिंतनिकेंत करावा लागेल. टिळक, केशवसुत व Bee यांच्या कविता संग्रहांत अनेक सुंदर चिंतनिका आहेत. किंबहुना, या तिघांनीं भावगीतांपेक्षा चिंतनिकाच अधिक लिहिल्या आहेत. परंतु टिळक व Bee यांचे मनोविकार हे विचारांच्या आधीन आहेत, तर केशवसुतांचे विचार हे मनोविकारांच्या आधीन आहेत. म्हणू-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नच त्यांच्या चिंतनिका विशेष उत्कट वाटतात. 'सतारीचे बोल', 'क्षणांत नाहीसे होणारे दिव्य भास', 'हरपलें श्रेय', 'कोणिकडुन गऽकोणिकडे'—इत्यादि केशवसुतांच्या कवितांकडे नमुनेदार चिंतनिका म्हणून अंगुलि दाखवतां येईल. 'वेडगाणें' ही Bee कवींची कविता गूढ व गहन विचार व्यक्त करणारी एक उत्कृष्ट चिंतनिका आहे.

चिंतनिकेंत उदात्त विचाराच्या जोडीला आकर्षक भाषा हवी. कारण भाषा व विचार यांचा परस्परसंबंध शरीर व जीव यांच्या युगलासारखा आहे.

उद्देशिका.

'Ode' या इंग्रजी शब्दाला 'उद्देशिका' हा मराठी प्रतिशब्द आहे. उद्देशिकेच्या वास्तविक स्वरूपासंबंधीं विद्वान् टीकाकारांत मतभेद आहेत. उद्देशिका ही मूळची ग्रीक. स्वतःच्या मायदेशांत साधारण प्रेमगीतापासून तों प्रगल्भ स्तोत्रापर्यंत सारे काव्यप्रकार तिच्या पोटांत समाविष्ट होतात. परंतु इंग्लंडांत तिला ठराविक कक्षेखेरीज अन्यत्र प्रतिबंध आहे. महाराष्ट्रांत ती इंग्लंडहून आली आहे. तेव्हां इंग्लंडांत तिचें स्वरूप कसें आहे, एवढेंच आपण पाहिलें पाहिजे. तेथें ती उच्च प्रगतिपर विषय, उदात्तभाव, विशाल उद्देश व गंभीर भाषाशैली यांना वाहिलेली आहे. ती नेहमी कुणासतरी उद्देशून लिहिलेली असते. म्हणूनच तिला 'उद्देशिका' हें नांव आहे. ती बहुधा स्तुतिपर असते. म्हणून 'स्तोत्र' हें दुसरें नांव आहे. पण हें नांव संस्कृतांतील एका विशिष्ट काव्यप्रकारास देण्याची रूढी असल्यामुळे मराठींत इंग्रजीच्या द्वारें आलेल्या या नव्या काव्यप्रकारास पहिलें नांव देणेंच इष्ट होईल. आपल्या प्राचीन काव्यवाङ्मयांत स्तोत्रांची उणीव नाही. 'कुठे गुंतलासी-पंढरीच्या राया' यासारखे तुकाराममहाराजांचे अभंग आणि 'अगा प्रणतवत्सला! म्हणति त्या जना पावला' यासारखे मोरोपंताचे टाहो हे उद्देशिकेंत अंतर्भूत होतील. अर्वाचीन काव्यवाङ्मयांतदेखील पाळंदेयांची 'रत्नमाला', कीर्तिकरांची 'भक्तिसुधा', टिळकांची 'अभंगांजलि', तांब्यांचें 'अनंताचें स्तोत्र', दत्तांचें 'शेवटचें मागणें', सावरकरांचें 'जगन्नाथाचा रथोत्सव' हें स्तोत्र या सर्वांना उद्देशिकेच्या पोटीं घातलें पाहिजे. मात्र ज्यांत अंतःकरणाचा ओलावा नाही, अशा क्रमिक पुस्तकांतील ठराविक ठशांच्या निर्जीव 'शारदास्तवनां'ना उद्देशिकेंत स्थान देतां येणार नाही.

उद्देशिकेंत कित्येकदा निरनिराळ्या दुव्यांची गुंफण सांधलेली असते. मात्र या सर्व दुव्यांतील भाव एकसारखाच असावा लागतो. पाळंदेयांच्या 'रत्नमालेंत' व टिळकांच्या 'अभंगांजलींत' एकाच भक्तिभावाने थबथबलेलीं अनेक स्तोत्रें व अभंग एका सरांत ओवण्यांत आलीं आहेत.

कित्येकदा उद्देशिका व चिंतनिका यांच्या सीमा एकमेकींत इतक्या मिसळून जातात कीं, इंद्रधनुष्यांतील वेगवेगळ्या रंगांप्रमाणें त्यांचा बोध झाला, तरी त्यांत भिन्नत्वदर्शक अशी रेषा ओढतां येत नाही. 'पुष्पाप्रत,' 'भृंग,' 'फुलपाखरू,'

★ कलात्मक मुद्रणाचें केन्द्र ★

महेश्वर मुद्रणालय

अमरावती

★ बाईंडिंग
★ रूलिंग
★ पुस्तक छपाई
★ नोट पेपर्स, पत्रिका,

फॉर्मस्, रजिस्टर्स आणि सर्व प्रकारची छपाईचीं कामें

विश्वासाने व तत्परतेने करून देण्यांत येतात.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'म्हातारी' आदि केशवसुतांच्या कविता वस्तुतः उद्देशिका आहेत. पण त्यांत चिंतनपरताहि विपुल प्रमाणांत आहे. 'तारातरंग,' 'रंगराव हर्षे' व 'चिंतोपंत उदास' या चंद्रशेखरांच्या उद्देशिकांत देखील तत्त्वचिंतनाचा पुष्कळ अंश आहे. बालकवींची 'कवीची इच्छा' ही कविताहि उद्देशिका व चिंतानिका यांचें संमिश्रण आहे. उद्देशिकेची उत्तम उदाहरणें म्हणून गोविंदाग्रजांची 'अवेळ तरिही बोल,' तांब्यांची 'उगिच काय बुल्बुला!' आणि माधवज्यूलियन्‌ची 'ऐकव तव मधु बोल' या कविता समोर करतां येतील.

उद्देशिकेच्या निर्मितीस क्वचित् सार्वजनिक उत्सवप्रसंग कारणीभूत होतो, किंवा क्वचित् समाजाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न निमित्त होतो. केशवसुतांची 'तुतारी', टिळकांचें 'रणशिंग', Bee कवींचा 'डंका', गोविंदाग्रजांचा 'दसरा' आणि बालकवींचा 'धर्मवीर' या कविता समाजसुधारणेच्या प्रेरणेने उत्स्फूर्त झाल्या आहेत. अर्थात् अशा प्रकारच्या कवितांत कवीच्या वृत्तींतला त्वेष, मतांतला अभिनिवेश आणि वाणींतला आवेश हा साहजिकच काव्यमय वक्तृत्वाचें रूप धारण करतो.

उद्देशिकेंत वृत्तवैचित्र्य असावें आणि तिचा विस्तार पन्नासपासून तों दोनशे पंक्तीपर्यंत असावा, असे दोन साधारण निर्बंध आहेत. परंतु ते तंतोतंत पाळलेच पाहिजेत, असें बंधन नाही. मात्र उद्देशिकेच्या पालुपदांत व अंतऱ्यांत चालींचा बदल असल्यास ती विशेष परिणामकारक वठतें, हें कबूल केलें पाहिजे. केशवसुतांची 'नव्या मनूंतिल नव्या दमाचा' ही कविता या विधानाची साक्ष देईल.

विलापिका

'Elegy' या इंग्रजी काव्यप्रकाराला 'विलापिका' हें मराठी नांव आहे. 'विलापिका' हा काव्यप्रकारहि मूळचा ग्रीक आहे. ग्रीकवाङ्मयांत या शब्दाचा अर्थ फार व्यापक होता. त्यांत समर गीतापासून तों स्मशानगीतापर्यंत सारीं काव्यें समाविष्ट होत असत. परंतु इंग्रजीवाङ्मयांत तो अर्थ संकुचित झाला. त्यांत ज्या गीतांत आपल्या प्रियजनाच्या मृत्यूपासून झालेला शोक शब्दांत सांगितला असेल, फक्त त्यालाच 'विलापिका' असें म्हणूं लागले. तेव्हा इंग्रजीवाङ्मयाशीं संबध्द असलेल्या मराठी वाङ्मयांत देखील शोकगीताला हीच मर्यादा लागूं केली पाहिजे.

विलापिकेंत निव्वळ प्रियजनाच्या निधनाने झालेला शोकच नसतो, तर शोकविव्हलतेच्या जोडीने कवीचा विवेक व मननशीलता यांचाहि सारभूत अंश असतो. शोक हा स्वाभाविक असला, तरी त्याला सीमा आहे. तेव्हा विलापिकेंत दुःख व विवेक यांचा सरस समन्वय असावा, हें साहजिक आहे.

मृत्यूशिवाय अन्य आपत्तींनी उत्पन्न झालेल्या शोकास विलापिकेंत स्थान नाही. क्षणभर दृष्टिआड झालेल्या प्रियकरणीसाठी सोडलेले सुस्कारे, ढाळलेले आसू व आळवलेलें आर्तगीत यांचा अंतर्भाव भावगीतांत होईल. परंतु कवीला आपल्या प्रियपत्नीचा चिरविरह झाला असेल, तर तो मात्र विलापिकेंत अंतर्गत होईल.

विलापिका हा व्यक्तिगत (Subjective) काव्याचा एक महत्त्वाचा विभाग आहे. कवि हा प्रामाणिक असेल, तर विलापिकेंत त्याच्या दुःखाला आपोआप वाचा फुटेल. दुसरा कोणताहि काव्यप्रकार विलापिकेइतका स्वाभाविक व सत्य नाही. तेव्हा तिच्यांत यत्किंचित्हि कृत्रिमता नको.

विलापिका ही व्यापक अशा राष्ट्रीय स्वरूपाची असूं शकते. आगाशांची रानड्यांवरील 'बिरुदावलि' ही विलापिका अथवा लेल्यांची लोकमान्यांवरील 'तिलकांजलि' ही विलापिका या विधानाचें समर्थन करतील. अशी तऱ्हेच्या विलापिकेंत दिवंगत विभूतीचें चरित्र, आठवणी व आख्यायिका यांचा समावेश होऊं शकतो. या गोष्टींच्या बाजूबाजूने तिच्यांत तत्त्वचिंतनहि हवें. आगाशांच्या 'बाष्पांजलीं'त व टिळकांच्या 'बापाच्या अश्रू'त बऱ्याच प्रमाणांत सखोल, सरस व सूचक असें तत्त्वचिंतन आहे.

विलापिकेंत क्वचित् अनिवार्य भाव व संयमशील विवेक यांचा मधुर संघर्ष साधलेला असतो. या

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दृष्टीनें टेनिसन्चें 'इन्मेमोरिअम्' हें काव्य आदर्श आहे. इंग्रजी काव्यवाङ्मयांत ग्रे कवीचें 'एलिजि रिटन् इन् कंट्री चर्च् यार्ड्' हें काव्य अजरामरत्व पावलें आहे. यांत मृत्यूपासून उद्भवलेला शोक नाही. परंतु वृत्तीची उदासीनता व चिंतनपरता आहे. त्यामुळे त्याला टीकाकार 'विलापिका' म्हणून मान्यत्व देतात. मराठी वाङ्मयांत अशा प्रकारचीं काव्यें नाहीत. नाही म्हणावयास ग्रे कवीच्या काव्याचीं दोन तीन मामुली भाषांतरें आहेत. पण त्यांत मूळांतील सौंदर्याचा लवलेशहि नाही.

मूळ ग्रीक वाङ्मयांत एका विशिष्ट वृत्तांत रचलेल्या कोणत्याहि गीतास 'Elegy' असें म्हणत असत. इंग्रजी वाङ्मयांत 'Elegy' या सदराखाली गीताचे निरनिराळे तीन चार प्रकार येतात. त्यांपैकी Dirge हा गीतप्रकार प्रेताला मूठमाती देतांना म्हणण्यांत येतो. Memorial Poems हीं गाणीं मृताच्या स्मरणार्थ रचलेलीं असतात. आणि Epitaphs या काव्यपंक्ति मृताच्या समाधीवर मृत्युलेख म्हणून कोरलेल्या असतात. इंग्रजी समाजाहून आपल्या समाजाच्या चालीरीती भिन्न आहेत. तेव्हा या निरनिराळ्या गीतप्रकारांचें आपल्याकडे स्तोम असण्याचें कारण नाहीं. परंतु विलापिका हा व्यक्तिनिष्ठ शोकगीताचा प्रकार अलीकडे आपल्याकडे रूढ झाला असल्यामुळे त्याच्या अनुषंगानें हा सर्व प्रपंच आवश्यक होता. शिवाय आपल्याकडेहि पूर्वजांच्या श्राद्धदिवशीं Memorial Poems या काव्यप्रकाराप्रमाणें नवा काव्यप्रकार रूढ करतां येणें शक्य आहे. प्रियजनाच्या पुण्यतिथीस रचलेल्या कविता Memorial Poems या सदरांत बसूं शकतात. त्याचप्रमाणें साधुसंतांच्या समाधीवर व राजेरजवाड्यांच्या छत्र्यांवर मृत्यूलेख (Epitaphs) कोरतां येणें शक्य आहे.

इंग्रजी वाङ्मयाप्रमाणें फारशी वाङ्मयांतहि विलापिकेसारखा एक स्वतंत्र गीतप्रकार आहे. त्यास 'मर्सिआ' असें म्हणतात. अनीस व दाग या दोघा लखनवी कवींनी नबाबांच्या राजवटींत करुणरसपरिप्लुत 'मर्सिए' लिहून उर्दू वाङ्मय संपन्न केलें आहे.

आपल्याकडे स्वतःच्या दुःखाला नसतें महत्त्व देण्याची प्रथा नसल्यामुळे संस्कृतसाहित्यांत व प्राचीन मराठी वाङ्मयांत 'विलापिका' हा स्वतंत्र काव्यप्रकार आढळत नाही. संस्कृतसाहित्यांत करुणरसाच्या अनुषंगानें कविकुलगुरूनें रघुवंशांत 'अजविलाप' व कुमारसंभवांत 'रतिविलाप' आळविण्यांत पराकाष्ठा केली आहे. भवभूतीनें उत्तररामांत रामाला करुण विलाप करावयास लावलें आहे आणि, जगन्नाथ पंडितानें 'भामिनीविलासांत' कुणी एक विरही विलाप करीत आहे, अशी कल्पना केली आहे. परंतु हे सर्व 'विलाप' नाट्यात्मक आहेत. संस्कृत साहित्यांत कांही काव्यें करुणरसानें ओतप्रोत आहेत. कांही काव्यांत सुभाषिताच्या रूपानें चिंतन आहे. त्यांना 'वैलापिक काव्य' अशी संज्ञा दिल्यास उचित होईल.

प्राचीन मराठी वाङ्मयांत लहरी मुकुंदा या शाहिराची 'दख्खनचा दिवा मालवला—हिरा हरपला' ही नारायणरावाच्या अमानुष वधावरील एकुलती एक राष्ट्रीय विलापिका दृष्टीस पडते. अर्वाचीन मराठी वाङ्मयांत इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनानें 'विलापिका' या काव्यप्रकारांत नांव घेण्याजोगी भर पडली आहे. ही भर घालणारांत आगाशे व टिळक हे अग्रेसर आहेत. यांच्याशिवाय मोगरे, कीर्तिकर, लेंभे, बेहेरे व सुमंत यांनींहि विलापिका रचल्या आहेत. त्या सर्वांत लेंभ्यांची 'शोकावर्त' ही कृति भावनेच्या दृष्टीनें हृदयंगम आहे. केशवसुतांची 'आईकरिता शोक', चंद्रशेखरांची 'दत्तवियोग', माधवानुजांची 'या क्रूर माझिया हातीं-लोटितों तुझ्यावर माती', तांब्यांच्या 'उडाला हंस' व 'प्रत', 'मुलाच्या निधनकालीं', रेंदाळकरांची 'सत्कवि माधवानुजांचा मृत्यु', सावरकरांची 'प्रभाकरास' आणि ना. ध. देशपांडे यांची आपल्या मातेवरील प्रदीर्घ मंदारमाला-हीं सर्व काव्यें विलापिकेचे मासले म्हणून पुढे करतां येतील.

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

औपरौधिका.

इंग्रजी वाङ्मयांतील 'Satire' या व्यक्तिनिष्ठ काव्यप्रकाराला मराठींत 'औपरौधिका' हें नांव अन्वर्थक ठरेल. कारण या काव्यप्रकारांत मनुष्याच्या दोषांचें व वैगुण्यांचें आविष्करण उपरोधानें करण्यांत येत असतें. हा काव्यप्रकार मनुष्याच्या आचरणांतील धरसोडपणावर आणि त्याच्या सोंगाढोंगावर टीकेची मोरे झोड उडवून देतो. त्यांत व्याजस्तुतिपासून तों उघड उघड निंदेपर्यंतचे सारे प्रकार दृष्टीस पडतात. व्यक्ति, समाजकारण, राजकारण व विवक्षित मतें यांवर हल्ला चढवावयाचा असेल, तर औपरौधिकेसारखें दुसरें अमोघ शस्त्र नाहीं.

औपरौधिकेचा रोख व्यक्तीवर नसून तिच्या दुर्गुणांवर असतो. ती कधी विनोदानें तर कधी मर्मभेदानें त्या दुर्गुणांचा निषेध करीत असते. व्यक्ति व समाज यांची सु रणा हाच तिचा एकमेव हेतु असतो. व्यक्तीची कुचाळकी व समाजाची नालस्ती हेच जर तिचे उद्देश असतील, तर मग मात्र तिला काव्यप्रकाराचा मान देतां येणार नाही.

Parody म्हणजे वाङ्मयविडंबन, Burlesque म्हणजे अनुकरण अथवा नक्कल, Lampoon म्हणजे अभद्र, विषारी, विदुषकी थाटाचा उपहास आणि Epigram म्हणजे लहानसेंच पण खोचदार काव्य-या सर्वांचा समावेश Satire म्हणजे औपरौधिकेंत करणें इष्ट होईल.

आपल्याकडे 'झेंडूच्या फुलां'त वाङ्मय विडंबनाचीं अनेक उदाहरणें आढळतात. उपाध्यांची 'चालचलाऊ गीता' आणि लिमयांचा 'बल्लवदूत' हीं अनुक्रमें 'भगवद्गीता' व 'मेघदूत' यांचीं उत्तम अनुकरणें आहेत. अनुकरणांत थोड्याफार फेरबदलानें प्रकृतीची विकृति केलेली असते. 'मूर्खांचा तर सुळसुळाट' हें केशवसुतांचें पद्य खोचदार काव्याचा खमंग मासला आहे. अभद्र, विषारी व विदुषकीथाटाचा उपहास आपल्याकडे नाही हें एकाप्रकारें बरें आहे. इंग्रजींत पोपचें 'डन्सिड' हें काव्य या प्रकारचें आहे. उर्दूत आतिष व सौदा यांनी अशा तऱ्हेची कविता लिहिली आहे.

औपरौधिकेच्या या निरनिराळ्या प्रकारांचा कधी कधी इतका एकजीव झालेला असतो की, त्यांस एकमेकांपासून अलग काढतां येणें कठिण होऊन बसतें. यांपैकी वाङ्मय विडंबन हा काव्य प्रकार आपल्याकडे फार लोकप्रिय झाला होता. तो लोकप्रिय करण्याचें श्रेय केशवकुमारांकडे जातें. मूळकाव्य मनांत उभे राहील अशा बेतानें त्या मूळ काव्याचाच अथवा त्यांतील मध्यवर्ती कल्पनेचा नांवापुरता आधार घेऊन त्यांनी पुष्कळच स्वतंत्र विनोद निर्माण केला आहे. 'मनाचे श्लोक' 'विराम चिन्हें, 'परिटा! येशिल कधिं परतून' इत्यादि त्यांचीं काव्यें या विधानाचा पाठपुरावा करतील. त्यांनी क्वचित् उपहासात्मक विडंबनें लिहिलीं आहेत. त्यांत कुठे कुठे कमी अधिक कुचेष्टा आहे. परंतु ते स्वतः कुशल कवि असल्यामुळे आणि त्यांचा स्वभाव निर्मत्सर

शालेय
बाल
लीलत
आणि
निबंध
वाङ्मय प्रसिद्ध करणारी
वऱ्हाड मध्यप्रांतांतील
एकमेव संस्था
ठाकूर आणि कंपनी लि.
अमरावती.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

व हेतुशुद्ध असल्यामुळें ती विडंबनेंहि खुसखुशीत उतरलीं आहेत.

आपल्या वाङ्मयांत उच्चप्रतीच्या औपरोधिका फारच थोड्या कवींनी रचल्या आहेत. ‘ अभिनव धर्मसंस्थापना ’, ‘ पदवीचा पाडवा ’ व ‘ मेथाजींची मजलस ’ या मोगऱ्यांच्या काव्यांत व्यंगदर्शनाचा हेतु परिणामकारक रीतीनें तडीस गेला आहे. गोविंदाग्रजांच्या ‘ चिंतातुर जंतूंत ’ आणि तांब्यांच्या ‘ किती महामूर्ख तूं शहाजहाँ ’ या काव्यांत उपयुक्तता वाद्यांवर औपरोधिक ताशेरा आहे. गोविंदाग्रजांच्या ‘ हुकमे हुकूम ’मध्यें कवि व संपादक यांचा मार्मिक उपहास आहे. बोवड्यांच्या ‘ प्रणयाच्या तीन अवस्था ’, ‘ लग्नकचेरींत नोंदून झालें ’; व ‘ प्रीतिविवाह ’ या काव्यांत विवाह विधींची गमतीदार चेष्टा आहे. त्यांच्या ‘ धावा धावा कवी आला ’ आणि ‘ आनंदी आनंद ’ या काव्यांत कवींचा मजेदार उपहास आहे. माधव ज्यूलियनच्या ‘ सुधारकां ’त तथाकथित सुधारकांच्या दोषांचें टीकात्मक प्रदर्शन आहे.

कांहीं गौण काव्यप्रकार.

आतापर्यंत ज्या काव्यप्रकारांची चर्चा केली, त्यांचें वर्गीकरण तदंतर्गत मनोभाव व विचार यांच्या अनुरोधानें केलें आहे. परंतु ज्यांचें वर्गीकरण वृत्तविरचनादि बाह्य आकृतींवरून करतां येईल असे कांहीं काव्यप्रकार आहेत. ते देखील व्यक्तिनिष्ठ (Subjective) काव्याच्या पोटीं येतात. त्यांत ‘ सुनीत ’ हा प्रकार विशेष महत्त्वाचा आहे. त्याचा विचार करण्यापूर्वी Descriptive Poem म्हणजे ‘ वर्णनपर काव्य ’ आणि Epistle म्हणजे ‘ पत्रात्मक काव्य ’ यांचा येथे निर्देशकरणें योग्य होईल. यांपैकीं पहिल्या काव्य प्रकाराची आधुनिक काव्यवाङ्मयांत हवीं तेवढीं उदाहरणें सांपडतील. वानगीदाखल केशवसुतांची ‘ दिवाळी ’ ही कविता वाचनीय आहे. ज्या काव्यांत एकाद्या देखाव्याचें अगर प्रसंगाचें हुबेहूब वर्णन असेल, त्यास इंग्रजांत ‘ Idyll ’ असें म्हणतात. ते देखावे अगर प्रसंग बहुधा ग्रामीण जीवनावर आधारलेले असतात. या प्रकारचे मासले म्हणून बालकवींच्या ‘ औदुंबर ’, ‘ मेघांचा कापूस ’ आणि अनिलांची ‘ हिवाळा ’ या कविता पुढे करतां येतील. ग. ह. पाटील व ठोकळ यांच्या काव्यसंग्रहांतहि अनेक सुंदर चित्रमय वर्णनें आहेत. दुसरा काव्यप्रकार विरळा आहे. त्याचें उदाहरण ‘ मे ’ च्या ‘ युगवाणी ’ त आहे. तें म्हणजे दुसऱ्या बाजीरावाला वेणूबाईनें धाडलेलें पत्र होय.

कांहीं समालोचक विषयाच्या अनुरोधानें पद, गाणें, भजन, आरती, भूपाळी, प्रभाती असें वर्गीकरण करतात. परंतु हे प्रकार उद्देशिकेच्या पोटीं येत असल्यामुळें त्यांचा निराळा विचार करण्याचें कारण नाहीं.

सुनीत

Sonnet या इंग्रजी नांवाला ‘ सुनीत ’ हा मराठी पर्याय रूढ झाला आहे. सुनीताचें स्वरूप काव्यप्रकार व वृत्तप्रकार असें द्विविध आहे. भिन्नभिन्न मनोभावांचीं आंदोलनें प्रकट करणारा चौदा ओळींचा हा वृत्तप्रकार इंग्रजी वाङ्मयांत अत्यंत लोकप्रिय आहे. मराठी वाङ्मयांत हा काव्यप्रकार सर्वस्वीं नविन आहे. तो रूढ करण्याचें श्रेय केशवसुतांकडे जातें. त्यासाठी त्यांनी शार्दूलविक्रीडित वृत्ताची निवड केली आहे.हें वृत्त जुनेंच आहे. परंतु त्याच्या चौदा चरणांची दोन भागांत विभागणी व विशिष्ट चरणांची सयमक योजना या गोष्टी मात्र नवीन आहेत.

इंग्रज कवींनी चरणांची सोयीस्कर विभागणी करून व विशिष्ट चरण सयमक ठेवून सुनीताचे अनेक भेद पाडण्याचे प्रयोग केले, पण ते बहुतेक फुकट गेले. मात्र त्यांत दोन भेद मुळांत अंगी असणाऱ्या गुणांमुळें कायम रूढ झाले. त्यांपैकीं पहिल्या भेदास ‘ इटॅलिअन् सॉनेट ’ हे नांव आहे आणि दुसऱ्या भेदास ‘ इंग्लिश किंवा शेक्सपीरिअन् सॉनेट् ’ हें नांव आहे.

सोळाव्या शतकांत इंग्लंडांत Wyatt या नांवाचा एक कवि झाला. प्रथम त्यानें ‘ इटॅलि-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अन् सॉनेट्' हाताळलें. या प्रकारच्या सुनीतामध्ये त्याच्या चौदा ओळींचे अष्टक व षष्टक असे दोन विभाग असतात. अष्टकांत विषयाचा उपन्यास असतो व षष्टकांत त्याचा विकास असतो. या दोन्ही विभागांत–विषयांच्या उपन्यांसात व विकासांत एकात्मता असणें आवश्यक असते. इतकेंच काय, पण या प्रकारच्या सुनीताचा एकंदर वृत्तविन्यास हा त्यांतील भावार्शी अथवा विचारार्शी संवादी असावा लागतो. शिवाय कवीच्या भावनेचीं आंदोलनें व वृत्तींतले पालट हे स्पष्ट रीतीने प्रकट होणें आवश्यक असते. या प्रकारच्या सुनीताच्या अष्टकांत अबबअ, अबबअ अशी आणि षष्टकांत यरल, यरल अशी किंवा यर, यर, यर अशी यमकयोजना असावी लागते. इंग्रज कवींनी अष्टकांतील यमकयोजनेचा निर्बंध कसोशीने पाळला आहे. परंतु षष्टकांतील यमकयोजनेबाबत शेक्सपीअरपासून तों आजतागायतच्या कवींपर्यंत कुणी कांहीहि धरबंध ठेवलेला नाही. त्यांत त्यांनी आपआपल्या सोयीप्रमाणें सवलती घेतल्या आहेत. उदाहरणार्थ, वर्डस्वर्थनें, 'टु मिल्टन' या सुनीतांतील षष्टकांत यरर, लयल अशी चमत्कारिक यमकयोजना केली आहे. इंग्रज कवींनी विचाराला कलाटणी देण्याच्या नियमांतहि क्वचित् सवलती घेतल्या आहेत. उदाहरणार्थ, मिल्टन्नें 'Avenge O Lord' या सुनीतांत विचाराला नियमानुसार अष्टकानंतर कलाटणी न देतां ती दहाव्या चरणाच्या द्वितीयार्धांत दिली आहे. सारांश, इटॅलिअन सुनीताच्या मूळ रूपावर असे अनेक इंग्रजी संस्कार घडले आहेत.

इंग्लिश किंवा शेक्सपीरिअन् सॉनेट् हें अशाच संस्कारांतून निर्माण झालें आहे. सॉनेट्चें हें नवें रूपांतर प्रथम प्रथम शेक्सपीअरच्या काव्यांत दृष्टिगोचर झालें, म्हणून त्यास शेक्सपीरिअन् सॉनेट् हें नांव मिळालें. या प्रकारच्या सुनीतांत एक द्वादशक व एक युग्मक अथवा तीन चतुष्टय व एक युग्मक अशी ओळींची विभागणी असते. द्वादशकांत अथवा तीन चतुष्टयांत विचाराचा उपन्यास असतो आणि युग्मकांत विचाराचा सारभूत अंश अथवा त्याला दिलेली अनपेक्षित कलात्मक कलाटणी असते. युग्मकांतील कलात्मक कलाटणीमुळे सुनीताचें सौंदर्य द्विगुणित होतें आणि त्यांतील भाव अथवा विचार हा नाटकांतील उत्कट प्रसंगाप्रमाणें प्रभावोत्पादक होतो. तीन चतुष्टयांतहि विचाराचे आरंभ, मध्य व अंत असे स्वाभाविक विभाग सोयीने पडत असल्यामुळे या प्रकारच्या सुनीताकडे इंग्रज कवींची ओढ अधिक आहे.

येथे सुनीतांतील दोन ठळक दोषांचा निर्देश करणें अनिवार्य आहे. पहिला दोष म्हणजे क्वचित् अंतिम युग्मक अजागळाप्रमाणें निरर्थक चिकटवल्यासारखें वाटण्याचा संभव असतो आणि दुसरा दोष म्हणजे क्वचित् यमकें ओढून ताणून जुळवल्यासारखी वाटण्याची भीति असते.

सुनीतांत वृत्तिवैचित्र्य उत्कटत्वाने प्रकट करण्याचें अद्भुत सामर्थ्य आहे, यांत शंका नाही. विशेषतः आठव्या चरणानंतर वृत्तींतील पालट व्यक्त करून पुन्हा ताज्या जोमाने नवा आरंभ करण्याची त्यांत जी सोय आहे, तिचा इतर काव्यप्रकारांत अभाव आहे. पुन्हा इंग्रजींतील Iambic Pentameter या वृत्ताप्रमाणेंच मराठींतील शार्दूलविक्रीडित या वृत्तांत त्याच्या नामानुसार वाटेल त्या वृत्तीच्या उद्रेकांतील उद्गार परिणामकारकतेने प्रस्फुटित करण्याची विलक्षण शक्ति आहे. त्यामुळे केशवसुतांसारख्या जातिवंत कवीला हा काव्यप्रकार आपल्याकडे आणण्याची स्फूर्ति व्हावी, हें अगदी स्वाभाविक होतें. केशवसुतांचें 'चिरवियुक्ताचा उद्गार' हें सुनीत इटॅलिअन् पद्धतीचें आहे, तर 'आम्ही कोण?' हें सुनीत इंग्लिश किंवा शेक्सपीरिअन् पद्धतीचें आहे. इंग्लिश किंवा शेक्सपीरिअन् पद्धतीचा पुरस्कार प्रथम तांब्यांनी केला. त्यांचीं 'गेली ज्योति विझोनिया' व 'जेव्हा लोचन हे तुझे' हीं त्या पद्धतीचीं दोन नमुनेदार सुनीतें आहेत. गोविंदाग्रजांचें 'ती कोण?' हें काव्य निर्दोष सुनीताचा एक उत्कृष्ट मासला आहे. रेंदाळकरांनीहि सुनीतें रचलीं आहेत, पण तीं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असावीं तशी नाहीत. गिरीशांचीं ‘ पुण्यपुरीस ’ व ‘ पितृस्मृति ’ हीं दोन्हीं सुनीतें सुंदर आहेत. माधवज्यूलियनच्या ‘ तुटलेल्या दुव्यां ’ त ‘ देवा ! स्त्रीहृदयीं ’ सारखीं दोनचार सुनीतें सरस आहेत. काळेल्यांचें ‘ निःशब्द कथन ’ हें सुनीत अतिशय हृदयंगम आहे. सरपटवारांचें ‘ चार पुरुषार्थ ’ हें सुनीत पुष्कळ प्रमाणांत निर्दोष आहे.

अलीकडे मराठी वाङ्मयांत सुनीताची लाट ओसरल्यासारखी दिसत आहे. वास्तविक हा काव्यप्रकार मागे पडावयास नको. वृत्ताची व विचारविस्ताराचीं विशिष्ट बंधनें असलेला हा काव्यप्रकार एकप्रकारें कवित्वाची खरी कसोटी आहे. तेव्हा होतकरू कवींनी हा प्रभावोत्पादक काव्यप्रकार हातचा दवडूं नये, अशी इच्छा आहे.

• • •

वाङ्मयाचें मूल्यमापन

(लेखांक ३ रा)

प्रा. अच्युत नारायण देशपांडे, एम्. ए.

● प्रा. अ. ना. देशपांडे यांच्या लेखनमालेचा हा तिसरा हप्ता. यांत त्यांनी ‘ अलंकारविचार ’ केलेला आहे. ‘ अलंकारा ’ ला ते ‘ विभ्रम ’ हा निराळा शब्द सुचवितात. आणि, ‘ विभ्रम ’ किंवा ‘ अलंकार ’ ही बाह्योपाधि नाही, तर ते कवीच्या व्यक्तित्वाचे स्वाभाविक घटक आहेत, असें प्रा. देशपांडे म्हणतात.

* * *

जीर्ण प्रवृत्तींचा परामर्ष

३

प्राचीन साहित्यशास्त्रकारांनी घालून दिलेल्या नियमांना शरण जाणें आणि वर्गीकरणाच्या तत्त्वाच्या ठिकाणीं प्रामाण्यबुद्धि प्रकट करणें – या दोन प्रवृत्ती वाङ्मयाच्या यथार्थ मूल्यमापनाच्या दृष्टीने कशा अप्रस्तुत आहेत, हें गेल्या दोन लेखांकांत मीं स्पष्ट केलें आहे. वाङ्मयनिर्मिती आणि वाङ्मयरसास्वाद या दोन महत्त्वपूर्ण प्रक्रियांसंबंधीं अत्यंत अवास्तव स्वरूपाचे भयंकर गैरसमज उत्पन्न करणारी व ते चिकाटीने व सातत्यपूर्वक शेकडों वर्षें टिकविणारी तिसरी एक साहित्यशास्त्रांतर्गत अनिष्ट प्रवृत्ति आहे. दुर्दैवाने या तिसऱ्या प्रवृत्तीलाहि हजारो वर्षांची भक्कम परंपरा लाभलेली आहे, काव्यशास्त्रांतल्या महान् महंतांनी तिचें मोठ्या ममताळूपणें पोषण व संवर्धन केलें आहे, आणि काव्यशास्त्राची केवळ तोंडओळख असलेल्या अगदी सामान्य प्रतीच्या रसिकजनांत तर तिने अपूर्व व अचल प्रतिष्ठा प्राप्त करून घेतली आहे! तिची ही फाजील आणि अप्रस्तुत प्रतिष्ठा नष्ट करून टाकून काव्यशास्त्रांतलें तिचें वाजवी स्थान तिला मिळवून देणें ही साहित्यशास्त्रांतील भ्रममूलक प्रवृत्तींचें निर्मूलन करण्याच्या दृष्टीने एक अत्यंत आवश्यक गोष्ट होऊन बसली आहे.

‘ अलंकार–विचार ’ ही ती तिसरी एवंगुण विशिष्ट सुप्रसिद्ध प्रवृत्ति होय. पाश्चिमात्य काय आणि पौरस्त्य काय, दोन्ही साहित्यशास्त्रांत या अलंकारविचाराची उभारणी अगदी चुकीच्या पायावर झाली आहे. काव्यनिर्मितींत अलंकारांना अगदी गौण लेखून त्यांच्यावर जे वेळोवेळीं आक्षेप घेण्यांत आले, तेहि चुकीच्याच भूमिकेवरून घेण्यांत आलेले आहेत. अलंकारांकडे पाहण्याचा मी जो नवा दृष्टिकोन मांडणार आहे तो स्पष्ट झाला म्हणजे त्या भूमिकेंतील भ्रामकपणा सुबुद्ध वाचकांच्या लक्ष्यांत येईल, असें वाटतें.

पाश्चिमात्यांमध्ये–विशेषतः ग्रीकांमध्ये–अलंकार-विचाराची जी वाढ झाली, ती काव्याच्या अनु-

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रोधानें न होता मुख्यतः वक्तृत्वकलेच्या अनुषंगानेच झाली. ॲरिस्टॉटलच्या ' Poetics ' मध्ये अलंकारांचें विवेचन जवळजवळ आलेलें नाहीच असें म्हटलें तरी चालेल. शब्दांचें विवेचन करतांना त्यानें " Every word is either current, or strange or Metaphorical or Ornamental or newly coined or lengthened or contracted or altered " फक्त या वाक्यांत अलंकाराचा उल्लेख केला असून त्यांच पुढे एका स्वतंत्र व कांहीशा प्रदीर्घ छेदकांत रूपकाची (Metaphor) सोदाहरण चर्चा केली आहे. वक्तृत्वकलेचें शास्त्र बनवूं पाहणाऱ्या विचारवंतांनीच प्राधान्यानें अलंकारांचें विवेचन केलेलें आढळतें. खि. पू. ५ व्या शतकांत अथेन्समध्यें वक्तृत्वकलेला उत्तेजन देण्याच्या हेतूनें प्रेरित होऊन गॉर्गियसने प्रथम अलंकृत भाषेचा पुरस्कार करायला सुरवात केली. या बाबतींत त्याला अग्रिगेंटमच्या एम्पेडोक्लसपासून स्फूर्ति आणि मार्गदर्शन मिळालें, असें ॲरिस्टॉटल म्हणतो. पुढे, गॉर्गियसचा शिष्य असलेल्या व ॲरिस्टॉटलचा समकालीन व प्रतिस्पर्धी असलेल्या आयसोक्रेटसनें वक्तृत्वकलेसंबंधी व गद्यलेखनासंबंधी विधायक सूचना करतांना अलंकारांविषयीं मधून-मधून त्रोटक चर्चा केलेली आढळते. ॲरिस्टाटलने आपल्या ' Rhetoric ' मध्ये वक्तृत्वांत व गद्यलेखनांत कलात्मकता कशी आणावी, याचें विवेचन करतांना रूपकाच्या योजनेचा पुरस्कार केला आहे आणि ती योजना समर्पक रीतीनें कशी करावी, यासंबंधीं सूचनाहि पण दिल्या आहेत. पुढे जेव्हा खि. पू. ४ थ्या शतकाच्या उत्तरार्धात ग्रीक वाङ्मयाचें आणि संस्कृतीचें केंद्र अथेन्सहून अलेक्झांड्रिया येथे आलें, तेव्हा वाङ्मयांत सृजनशील प्रतिभेचें दर्शन दुर्मिळ होऊं लागलें, आणि काव्याच्या बाह्य उपाधि म्हणून समजल्या गेलेल्या व्याकरण, अलंकार, वगैरे गोष्टींची चर्चा करणारें प्रचंड पुस्तकी पांडित्य बाहेर पडलें. त्यानंतर खि. पू. २ ऱ्या शतकांत होऊन गेलेल्या थ्रॅक्सच्या डायोनिससनें लिहिलेल्या ग्रीक भाषेच्या 'Grammar' नांवाच्या पहिल्याच चिमुकल्या व्याकरणांत इतर कांही भाषाशास्त्रविषयक व काव्यशास्त्रविषयक बाबींबरोबरच अलंकारांचेंहि विवेचन केलेलें आढळतें. त्यानंतर ग्रीकसाहित्य-विवेचकांच्या पावलांवर पाऊल ठेवून सिसेरो, क्विंटिलियन-वगैरे रोमन वक्तृत्वकलाविवेचकांनीहि भाषेचें बाह्य सौंदर्य वाढविण्याच्या दृष्टीनें अलंकारांचें विवरण केलेलें दिसून येतें.

पाश्चिमात्यांच्या अलंकारविचारापेक्षा आपल्याकडील संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांनी प्रतिपादिलेल्या अलंकारविचारांत अधिक सूक्ष्मता आणि शास्त्रीयता प्रत्ययास येते. आपल्याकडील अलंकारशास्त्राची वाढ ही काव्यशास्त्राचा एक अविभाज्य विभाग म्हणून झालेली आहे. भरतानें आपल्या नाट्यशास्त्रांत उपमा, दीपक, रूपक व यमक या चार अलंकारांचा उल्लेख केला असला, तरी अलंकार-विचाराला पायाशुद्ध स्वरूप प्राप्त करून देणारा भामह हाच अलंकारशास्त्राचा मुख्य प्रवर्तक समजला जातो. भामह आणि त्याच्या अलंकार-मताला साथ देणारे उद्भट, दंडी, रुद्रट, प्रतीहारें-दुराज-वगैरे साहित्यशास्त्रज्ञांनी अलंकाराची, त्याला काव्याचा एक महत्त्वाचा घटक मानूनच चर्चा केली. रीतिमताचा प्रामुख्यानें पुरस्कार करणाऱ्या वामनाला सुद्धा अलंकारांचें काव्यांतील आवश्यक स्थान मान्य होतें, असें त्याच्या ' काव्यं ग्राह्यमलंकारात् । ' या सूत्रावरून स्पष्टच होतें. आपल्यापूर्वी होऊन गेलेल्या रस, अलंकार, रीति, ध्वनि, वक्रोक्ति, औचित्य-वगैरे नानाविध काव्य-तत्त्वांचा ज्यानें आपल्या 'काव्यप्रकाशां'त समुचित समन्वय करण्याचा प्रयत्न केला, त्या मम्मटानें अलंकारांचें काव्यांतील अगदींच गौण स्थान मानून सुद्धा अलंकाराशिवाय काव्य क्वचितच संभवूं शकतें, असेंहि सांगून टाकलें. ' तददोषौ शब्दार्थौ सगुणौ अनलंकृती पुनः क्वापि ॥ ' ही त्याची काव्याची व्याख्या सुप्रसिद्धच आहे. तिकडील अलेक्झांड्रिया येथील विद्वानांप्रमाणे आपल्या इकडील संस्कृत साहित्यपंडितांनी चुकीच्या पायावर या अलंकारविचाराचें भलतेंच स्तोम माजविलें आणि त्याचा अगदी बारीक कीस पाडून

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अलंकारांची संख्या शे-सवाशेइतकी फुगविण्यांतच धन्यता मानून घेतली !

मराठींत जो अलंकारविचार आला आहे, तो बव्हंशीं संस्कृतांतील अलंकारविचाराचा अनुवादच आहे,असें म्हटलें पाहिजे. गोरे-भिडे वगैरेंच्या केवळ अलंकारांची माहिती देणाऱ्या पुस्तकांत, तसेंच, काव्यशास्त्राचें विवेचन करणाऱ्या जोग-वाटवे-केळकर वगैरेंच्या ग्रंथांत अलंकारांचें जें विवरण आलें आहे, तें जवळजवळ सर्वस्वी संस्कृतांतील त्यासंबंधींच्या विचारपद्धतीला आदर्श व अनुकरणीय कल्पूनच केलेलें आहे.

अलंकारविचाराचें हें अगदी स्थूल व त्रोटक स्वरूपांत कांहीसें ऐतिहासिक समालोचन करण्याचा हेतु हा की, तो किती प्राचीन आहे आणि त्याला केवढ्या थोरामोठ्या साहित्यशास्त्रज्ञांचा पाठिंबा आहे, हें वाचकांच्या लक्षांत यावें.

ज्याच्यावर पाश्चिमात्यांचें सारें साहित्यशास्त्र आधारलेलें आहे तें ग्रीकांचें साहित्यशास्त्र, आणि हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतिक भाषांतील अलंकारचर्चा ज्याच्यावर प्रामुख्यानें अधिष्ठित झाली आहे तें संस्कृत साहित्यशास्त्र या दोहोंचाहि अलंकारांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्णपणें एकच आहे. तो दृष्टिकोन थोडक्यांत असा:

"अलंकार ही काव्याची एक बाह्य उपाधि होय. संस्कृत काव्यशास्त्राच्या परिभाषेच्या आधारें सांगायचें म्हटलें, तर असें म्हणतां येईल की, शब्दार्थ हें काव्याचें शरीर होय, रस हा आत्मा होय आणि अलंकार हीं वरून शरीरावर घालावयाचीं जड, कृत्रिम भूषणें होत! कवीला जेव्हा एखादी कल्पना स्फुरते, एखादा विचार स्फुरतो, अथवा एखादें सत्य प्रतीत होतें, तेव्हा ती कल्पना किंवा तो विचार किंवा तें सत्य प्रत्यक्ष कवितारूपानें लिहून काढण्यापूर्वी तो त्याला उपमाउत्प्रेक्षादि अर्थालंकारांनी आणि जमल्यास यमकानुप्रासादि शब्दालंकारांनी मढवून टाकतो आणि मग तें काव्य रसिकजनांपुढे मांडतो. प्रत्यक्ष काव्यनिर्मितीशीं अलंकारविचाराचा अर्थाअर्थी कांही संबंधच नाही. आधी काव्य कवीच्या अंतःकरणांत जन्मास येतें आणि मग कवि त्याचें कोडकौतुक करण्याकरिता त्याला नाना प्रकारच्या अलंकारांच्या रंगीबेरंगी आंगड्यांनी सजवितो"

अलंकारांकडे पाहण्याचा हा उपरोक्त दृष्टिकोन ग्रीक साहित्यशास्त्रज्ञांच्या विवेचनांत कधी अप्रत्यक्षपणें तर कधी उघडपणें व्यक्त झालेला आहे. भाषेला नटविण्याच्या कृत्रिम युक्त्या या दृष्टीनेच त्यांच्यापैकी बहुतेक साहित्यशास्त्रज्ञ अलंकारांचें विवेचन करीत असलेले आढळून येतात. काव्यशक्तीचें अत्यंत मार्मिक आणि मूलगामी विवरण करणारा म्हणून प्रसिद्ध असलेला ग्रीक टीकाकार लाँगिनस असें जेव्हा म्हणतो की, "A Figure looks best when it escapes one's notice that it is a Figure," तेव्हा सुद्धा आपण आपल्या काव्यावर अलंकार चढवीत आहों, ही कवीला स्पष्ट जाणीव असते, असें तो गृहीत धरून चाललेला दिसून येतो. संस्कृत साहित्यशास्त्रकारांचीं तर उपरोक्त दृष्टिकोनाला अनुकूल अशीं किती तरी वचनें सहज उद्धृत करतां येतील. त्यांपैकी कांही ठळक वचनें येथे उद्धृत करतों.

दंडी म्हणतो: 'काव्यशोभाकरान् धर्मान् अलंकारान् प्रचक्षते।' अलंकार हे काव्याला शोभा आणणारे आहेत, असें म्हणण्यांत दंडी उघड उघड अलंकारांचें बाह्योपाधित्व मान्य करतो. विश्वनाथ तर त्याच्याहि पुढे जाऊन अलंकाराबद्दल म्हणतो: "शब्दार्थयोरस्थिरा ये धर्माः शोभातिशायिनः।" गुण हे काव्याचे स्थिर धर्म आहेत, अलंकार अस्थिर आहेत, असा भेद करून तो अलंकारांबद्दल लिहितो: "अस्थिरा इति नैषां गुणवदावश्यकी स्थितिः।" या बाबतींतली भूमिका अत्यंत स्पष्टपणें जर कोणीं मांडली असेल, तर ती कुंतलानें. स्वभावोक्तीला अलंकारपदवी देणें योग्य नाही, हें सिद्ध करण्याकरिता त्यानें जो युक्तिवाद केला आहे, त्या युक्तिवादावरून त्याची आणि पर्यायानें साऱ्या संस्कृतसाहित्यशास्त्र्यांची अलंकारांकडे पाहण्याची भूमिका अगदी स्पष्ट होते. स्वभावोक्तीच्या अलंकारपदवीचें खंडन करण्याकरिता तो प्रश्न विचारतो.

अलङ्कारकृतां येषां स्वभावोक्तिरलङ्कृतिः।
अलङ्कार्यतया तेषां किमन्यदवतिष्ठते॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कुंतलाच्या या प्रश्नांत अगदी सरळ सरळ हें सूचित केलें आहे की, अलंकार ही काव्यावर बाहेरून शोभेकरिता घालावयाची वस्तु आहे; ती काढून टाकली तरी त्या काव्याचें काव्यत्व अबाधितच राहूं शकतें. 'अलंकार्य' वस्तू आधीच तयार असते; तिचें सौंदर्य वाढविण्याकरिता तिच्यावर बाह्य अलंकारांची योजना करावयाची असते. विश्वनाथाने वापरलेल्या 'अस्थिर' या विशेषणांतसुद्धा हाच अर्थ अभिप्रेत आहे.

ग्रीक आणि संस्कृत साहित्यशास्त्रकारांची अलंकारविषयक भूमिका एखादा लौकिक जीवनांतला दाखला घेऊनहि स्पष्ट करतां येईल. अलीकडे बायका पांढरी वायल विकत घेतात आणि मग तिची आकर्षक गोल साडी बनविण्याकरिता तिला आपल्याला आवडेल त्या रंगाने रंगवून घेतात वा नानाविध चित्रविचित्र आकृती तीवर छापून घेतात. कवि हा या दृष्टीनें बायकासारखाच असतो. त्याच्याजवळ अगोदर पांढऱ्या वायलशीं साम्य असलेली काव्य ही 'अलंकार्य' वस्तु तयारच असते; मग तो त्या गोल साडीप्रमाणे तिला आकर्षक बनविण्याकरिता नानाविध शब्दार्थालंकारांनी विभूषित करतो! विशेष लक्ष्यांत ठेवण्याचा मुद्दा हा की, हे अलंकार काढून टाकले तरी मूळची अलंकार्य वस्तु, मूळचें काव्य, कायमच राहतें!

अलंकारांकडे पाहण्याचा हा साहित्यशास्त्रज्ञांचा दृष्टिकोन वाङ्मयनिर्मितीच्या प्रक्रियेशीं कसा पूर्णपणें विसंवादी आहे, हें आपणांस पाहावयाचें आहे. त्याकरिता, आजपर्यंतच्या रूढ अर्थानें ज्यांत अलंकारांचा उपयोग केला आहे अशा कांहीं कवितांचीं उदाहरणें घेऊन त्यांतील अलंकारांच्या योजनेच्या प्रक्रियेचें रहस्य समजावून घेण्याचा प्रयत्न करूं. केशवसुतांची 'म्हातारी' ही कविता त्या दृष्टीनें अभ्यास करण्यासारखी आहे. या कवितेची भूमिका अशी आहे : कवि आपल्या लहानग्या मुलीला जवळ घेऊन घराच्या दारांत उभा असतां एक म्हातारी तरंगत आली. त्या मुलीला ती म्हातारी दिसल्याबरोबर ती तिच्याकडे पाहण्यांत, तिच्याशीं खेळण्यांत लगेच दंग झाली. मुलीची ही आनंदी अवस्था पाहून कवि म्हणूं लागला.

दडपण संसृतिचें निघालें मम चित्तावरचें
मन्मनही लागे तरंगू म्हातारीसंगें!

आपल्या मुलीप्रमाणे आपणहि त्या म्हातारीशी समरस व्हावें, आपलें वय विसरून 'मुग्ध-मधु-बाल्यीं' उतरावें, प्रत्यक्षांतून परोक्षांत घेऊन जाण्याचें जें म्हातारीपाशीं सामर्थ्य आहे त्या सामर्थ्याचा आपणास साक्षात्कार व्हावा, अशी इच्छा, सांसारिक चिंतांना विहून, कवीच्या अंतःकरणांत निर्माण झाली; हळूहळू ती इच्छा उत्कट होऊं लागली आणि त्या इच्छेच्या स्वाभाविक उत्कट अवस्थेत, आपल्या मुलीची निष्पाप वृत्ति आणि आपली पापी वृत्ति यांतील विरोधाच्या जाणिवेने कवीच्या तोंडून त्या म्हातारीला उद्देशून सहजच उद्गार बाहेर पडले :

वा गन्धर्वांचें विमानच सूक्ष्मरूप साचें
वद असशी कां तूं तरंगत वातावरणांतून्?
सूक्ष्म देह धरुनी असति का तुजवरि ते बसुनी?
दिव्य असें गाणें गात ते असतिल सौख्यानें
तें मज पाप्याला कशाचें ये ऐकायाला
परि मम वस्तेतें गमे तें परिसाया मिळतें
म्हणुनिच उल्हासें
अशी ही वेडावुनि हांसे!

कवीच्या अंतःकरणांतील उत्कट मनीषेची अगदी सहज स्वरूपाची परिणति, परंपरागत अलंकार-विषयक परिभाषेत बोलायचें म्हटलें म्हणजे वरील ओळींतील 'उत्प्रेक्षे'त झाली आहे. म्हातारी आणि गन्धर्वांचें सूक्ष्मरूप विमान यांत जें साम्य कवीनें कल्पिलेलें आहे, तें ओढून ताणून आणलेलें नव्हे, डोकें खाज-खाज-खाजवून म्हातारीवर लादलेलें नव्हे, किंवा म्हातारीशीं सदृश असूं शकणाऱ्या बऱ्याचशा मूर्तामूर्त वस्तूंतून निवड करतां करतां, 'हां, ही उत्प्रेक्षा ठीक जुळते'—अशा समाधानांतून कृत्रिम रीतीने जन्मास आलेलेंहि नव्हे! कवीच्या अंतःकरणांत उद्भूत झालेल्या मनीषेचाच, ही उत्प्रेक्षा एक अविभाज्य भाग होय. येथे दुसरी कोणतीहि उत्प्रेक्षा येणें शक्य नव्हतें; कारण कवीच्या

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
विदर्भ साहित्य संघ

अंतःकरणांतील विशिष्ट तीव्र मनीषेचा आविष्कार करणारी ही कविता एक पूर्ण वस्तु आहे. म्हणून तिच्यांतील मूळ 'अलंकार्य' वस्तु निराळी असून विमानत्वाच्या आरोपासारखी 'अलंकार' ही वस्तु म्हणजे त्या मूळ वस्तुवर लादलेली उपरी, बाह्य, अस्थिर उपाधि होय, अशी कल्पना करणें केवळ अप्रस्तुतपणा आणि अप्रयोजकपणा होय!

पुन्हा, वरील ओळींत 'लहान मुलें हीं देवाचीं लाडकीं असतात, तीं नुकतींच देवाघरून या मर्त्यलोकीं आलेलीं असतात' – ही जी रूढ पण गोड समजूत अप्रत्यक्षपणें व्यक्त केली आहे, ती कवीने आपल्या मूळ मनीषेला खुलविण्याकरिता मुद्दाम, ओढून ताणून आणलेली नव्हे, तर त्या मनीषेच्या उत्कट अवस्थेंतील तिचा एक स्वाभाविक अंश म्हणूनच व्यक्त झाली आहे.

केशवसुतांची 'दुर्मुखलेला' ही आणखी एक कविता आपण विचाराकरिता घेऊं. वर्गांतील एका शिक्षकाने कवीला दुर्मुखलेला म्हटलें असतां स्वाभाविकपणें त्या भावनाशील कवीचा स्वाभिमान डिवचला गेला. त्याला विलक्षण त्वेष चढला; तो जळजळता त्वेषच या कवितेंत कवीने व्यक्त केला आहे. 'माझें शुष्क मुख सर्व प्रेक्षकांच्या चित्ताचा विरस करणारें आहे, हें अगदी उघड सत्य असून सुद्धा त्याचा मुद्दाम उल्लेख करण्यांत तुम्हाला कोणतें भूषण मिळालें?'—असा त्या शिक्षकाला उद्देशून प्रश्न विचारल्यावर कवि त्यालाच उद्देशून पुढे म्हणतात :

"याचें तोंड कुरूप हें विधिवशात् गाईल काव्यें नवीं
तेणें सर्वहि डोलतील जन हे हर्षें कदाचित् भुवि!"
विद्यासंस्कृत त्या तुझ्या, क्षणभरी, मस्तिष्कतंतूंवरीं
येतां नम्र विचार हा तुज भला होता किती तो तरी!
जे मुंग्या म्हणुनी मनीं समजशी या मंडळीभीतरीं
ते पक्षी उडतील होउनि गुरो! व्योमीं न जाणो वरी!
राखेचीं ढिपळें म्हणोनि दिसतीं जीं, तीं उद्या या जगा
भस्मीसात् करणार नाहित, अशी तुम्ही हमी द्याल का?

नेहमीच्या अलंकाराच्या भाषेत बोलायचें म्हटलें, तर असें म्हणतां येईल की, वरील श्लोकांपैकी पहिल्या श्लोकांत जें विधान केलें आहे, तें पटविण्याकरिता दुसऱ्या श्लोकांत दोन दृष्टान्त दिले आहेत. म्हणजे असें की, पहिला श्लोक हा अलंकार्य आहे आणि दुसरा श्लोक हा त्यावर चढविलेला अलंकार आहे. हा अलंकार काढून टाकला, तर मूळचें अलंकार्य, मूळचें विधान, मूळचें काव्य कायमच राहील!"—हीच, हीच ती अलंकाराकडे पाहण्याची दृष्टी अत्यंत भ्रामक आहे! काव्यनिर्मितीच्या प्रक्रियेचा पडताळा घेऊन पाहिला, तर खरी वस्तुस्थिति अगदीच निराळी आहे, असें म्हणावें लागेल. कवीच्या अंतःकरणांतील त्वेषाच्या भावनेचा आविष्कार करणारी ही कविता एक स्वयंपूर्ण आणि संपूर्ण वस्तु आहे, तिच्यांतले कांही श्लोक मूळ प्रतिपाद्य भावनेबद्दल आहेत व कांही त्या भावनेच्या सजावटीकरिता तयार केलेल्या अलंकाराचे अथवा कल्पकतेचे आहेत, असें वर्गीकरण करणें म्हणजे स्वतःच्या निर्बुद्ध अरसिकतेची स्पष्ट कबुली देण्यासारखेंच होय. वरील दोन श्लोकांपुरतेंच बोलायचें ठरविलें तर असें म्हणतां येईल की, पहिल्या श्लोकांत व्यक्त झालेली कवीच्या ठिकाणची आपल्या काव्यकर्तृत्वाच्या रास्त पण दांडग्या व त्वेषसंयुक्त अहंकाराची भावनाच दुसऱ्या श्लोकांतील दृष्टान्तांच्या रूपाने अगदी सहज रीतीने विकसित स्वरूपांत व्यक्त झाली आहे. त्या भावनेच्या उत्कट कैफांत स्वाभाविकपणें स्फुरलेले दृष्टान्त दुसऱ्या श्लोकांत प्रकट झाले आहेत. ते दृष्टान्त त्या भावनेशीं एकजीव झालेले आहेत. नव्हे—त्या दृष्टान्तांच्या रूपानेच त्या भावनेच्या तीव्र अवस्थेने मूर्त स्वरूप धारण केलें आहे!

अलंकाराकडे पाहण्याच्या मी मांडीत असलेल्या दृष्टिकोनाच्या समर्थनार्थ ज्ञानेश्वरीसारख्या किंवा इतर कोणत्याहि श्रेष्ठ मराठी संतकवीच्या अव्वल दर्जाच्या काव्यग्रंथांच्या पानापानांतून किती तरी उदाहरणें उद्धृत करतां येतील! ज्ञानेश्वरांचें अलौकिक व्यक्तिमत्व इतक्या विशाल आणि सखोल अनुभूतींनी समृद्ध बनलें होतें की, त्यांच्या अंतःकरणांत एखादा विचार सहज रीतीने प्रकाशित झाला की, तो बाहेर प्रकट होतांना आपल्या

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्रभावाला शोभेल अशा आवश्यक आणि योग्य दृष्टान्तरूपी किरणसंभारासहितच बाहेर पडायचा! उदाहरणादाखल आपण त्यांच्या पहिल्याच अध्यायांतील खालील ओव्या घेऊं :

परि अपराधु तों आणिकु आहे।
जें मी गीतार्थु कळूं पाहें।
तें अवधारां विनउं लाहें। म्हणौनिया॥
हें अनावर विचारितां।
वायां चि धिवसा उपनला चित्ता।
यऱ्हवीं काइ भानुतेजीं खद्योता। शोभा आथि॥
कां टिटिभु चाचुवेन्हीं।
माप सुचे सागरीं।
मी नेणतु तिया परी। प्रवर्ते एथ॥
आइकां आकाश गवसावें।
तरि आणिक तैसेंचि होआवें।
म्हणौनि अपाडु हें आघवें। निर्धारितां॥
एया गीताशास्त्राची थोरी।
स्वयं शंभु विवरी।
जेथ भवानी प्रश्नु करी। चमत्कारौनि॥
तेथ हरु म्हणे जेवि नेणिजे।
देवी जैसें कां स्वरूप तुझें।
हें नित्यनूतन देखिजे। गीतातत्त्व॥
हा वेदार्थसागरु।
जेया निद्रिस्ताचा घोरु।
तो स्वयें सर्वेश्वरु। अनुवादला॥
ऐसें जें अगाध।
जेथ वेडावति वेद।
तेथ अल्प मी मतिमंद। काइ होयें॥
हें अपार कैसें कवलावें।
महातेज कवणें ढवळावें।
गगन मुठी सुआवें। मशकें केवि॥

वरील ओव्यांमध्ये 'गीतार्थ कवळण्याकरिता मी अतिमंद अति असमर्थ आहे'–ही जी भावना व्यक्त झाली आहे, तिच्याबरोबर खद्योत–टिटिभु–मशकादिकांवर आधारलेले दृष्टान्त तिच्याशीं एकरूप होऊन, तिचाच एक अविभाज्य भाग बनूनच व्यक्त झाले आहेत. खऱ्या रसिकाला त्यांतील भावना आणि दृष्टान्त यांचें विच्छेदन करण्याचें अनुचित आणि अप्रस्तुत कर्म करणें कधीच शोभणार नाही. 'या ओव्यांतील भावनेचे चरण हे आणि कल्पनेचे अथवा अलंकारांचे चरण हे, भावनेची मर्यादा ही आणि कल्पनेची मर्यादा ही' असें विलगीकरण करणें म्हणजे त्या काव्यकुसुमाला चुरगळून टाकणेंच होय!

अलंकारांना बाह्य उपाधि समजणाऱ्यांची कल्पना अशी असते की, कोणत्याहि वाङ्मयीन कृतींतील भावना आणि कल्पना किंवा अलंकार या दोन गोष्टी एकमेकापासून अगदी वेगळ्या करतां येतात! याच कल्पनेंतून दुसरीहि एक तितकीच चुकीची कल्पना जन्मास येते. ती ही की, त्या वाङ्मयीन कृतींतील मूळ भावना जशीच्या तशी कायम ठेवून तिच्यांतील अलंकार मात्र वाटेल तसे बदलतां येतात आणि हा बदल करून त्या कृतीची शोभाहि वाढवितां येते! साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेची खरी भूमिका न कळल्यामुळेच हा सारा समजुतीचा घोटाळा उत्पन्न होतो. खरी भूमिका अशी की, कवि जेव्हा अगदी सहजस्फूर्त रीतीने आपल्या व्यक्तित्वाला आविष्कृत करूं पाहतो, तेव्हा तें व्यक्तित्व संपूर्ण स्वरूपांत व उत्कट रीतीने प्रकट होतें. आपण ज्यांना 'भावना' व 'कल्पना' म्हणतों, त्या या दोन घटकांचें पूर्ण अद्वैत त्या आविष्काराकरिता धडपडणाऱ्या व्यक्तित्वांत प्रस्थापित झालेलें असतें. मोर जसा जन्माला येतो, तेव्हाच आपला शोभिवंत पिसारा बरोबर घेऊनच येतो; त्याचप्रमाणे, कवीच्या अंतःकरणांतील भाव वा विचार जेव्हा व्यक्त होतो, तेव्हा तो त्याच्या आविष्काराला योग्य अशा निवडक व अत्यंत समर्पक कल्पनांसहित म्हणजे अलंकारांसहित बाहेर पडतो! मोराच्या बाबतींत त्याच्या इतर शरीरावयवांपासून त्याचा पिसारा वेगळा तरी दाखवितां येतो; पण काव्यांत, वाङ्मयांत भावना व कल्पना एकमेकांत इतक्या मिसळून गेल्या असतात, त्या इतक्या एकात्म झाल्या असतात की, या काव्यांतली ही भावना आणि ही कल्पना–असें नेमकें बोट ठेवून दाखविणें अशक्य असतें.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुन्हा, या ठिकाणीं आणखीहि एक गोष्ट लक्ष्यांत घेतली पाहिजे. ती ही की, कवि आपली विशिष्ट अनुभूति विशिष्ट काव्याच्या रूपानें व्यक्त करीत असतो. त्याची ती अनुभूति जर खरोखरच उत्कट आणि प्रामाणिक असेल, तर तिला आविष्कृत करणाऱ्या त्या काव्यांतच तिचें खरेंखुरें व्यक्तीकरण झालें आहे, असें म्हटलें पाहिजे. त्या काव्यांतला शब्दन्‌शब्द त्या अनुभूतीच्या प्रकटीकरणाला अगदी समर्पक असाच असतो. त्या काव्यांतला एखादा शब्द वा रूपक वा दृष्टान्त अभिव्यक्तीच्या समर्पकतेच्या आणि प्रभावाच्या दृष्टीनें बदलून त्याऐवजीं दुसरा शब्द वा रूपक वा दृष्टान्त घालणें योग्य असेल, तर तो पहिला शब्द वा रूपक वा दृष्टान्त त्या अनुभूतीच्या आविष्काराला अयोग्य होता, असेंच सिद्ध होतें. कोणत्याहि प्रामाणिक व स्फूर्तिनिष्ठ कवीच्या बाबतींत एका विशिष्ट अनुभूतीला एकच एक विशिष्ट अभिव्यक्ति, असा सिद्धान्त प्रत्यक्ष प्रतीत होतो. खऱ्या काव्यांत जे अलंकार आलेले असतात, ते त्यांतील भावनेच्या वा विचाराच्या उत्कट अवस्थेंतून स्वाभाविकपणें उदयास आलेले असतात, म्हणून त्या भावनेशीं वा विचाराशीं अगदी एकजीव झालेले असतात आणि म्हणूनच त्यांत बदल करणें व त्यांना बाह्य उपाधि कल्पिणेंहि योग्य नसतें. अलंकार हे व्यक्त होण्याकरिता धडपणाऱ्या कवीच्या व्यक्तित्वाचे स्वाभाविक घटक कसे असतात, यासंबंधीं विवेचन करतांना क्रोचे लिहितो: " Here it may be asked how an ornament can be joined to expression. Externally? In that case it is always separated from the expression. Internally? In that case, either it does not assist the expression and mars it; or it does form part of it and is not an ornament but a constituent element of the expression indivisible and indistinguishable in its unity."

ज्या काव्यांत क्रोचेच्या वरील उताऱ्यांत म्हटल्याप्रमाणे अलंकार हे आविष्कृत भावाला बाहेरून चिकटवलेले असतात अथवा त्या भावाचें अभिव्यक्तीचें परिणामकत्व नष्ट करून टाकणारे असतात, अशींहि खोटीं काव्यें पुष्कळ असतात आणि आहेत. असें काव्य लिहिणाऱ्या कवींचें अंतःकरण अगदी आतून उफाळून बाहेर येत नाही; तें आविष्काराकरिता अस्वस्थ होत नाही; त्याला आत्मप्रतीतीचा साक्षात्कार होत नाही; उत्कट व प्रामाणिक अनुभूतीच्या अभावीं त्याच्या काव्यांत जिवंतपणाचा लवलेशहि सापडत नाही. असे कवी, कवी होण्याच्या दांडग्या हौसेनें प्रेरित होऊन, 'बहुत पाहिलें ग्रंथांतर। तयासारखा उतार। आपणहि केला॥ '—असा उद्योग करतात आणि मोठ्या प्रयासानें निर्जीव व कृत्रिम शब्दार्थालंकारांच्या शाब्दिक कसरती करून अजाण व भोळ्या रसिकांना थक्क करून सोडतात! गोविंदाग्रजांचें बहुतांश वाङ्मय हें अशाच प्रकारच्या वाङ्मयांत मोडणारें आहे. उदाहरणांकरिता, त्यांच्या 'दसरा,' 'चिमुकलीच कविता,' 'अरुण,' 'पानपतचा फटका,' 'प्रेमपाठ' या कविता रसिकांनी पुन्हा एकदा वाचून पाहाव्या आणि त्यांत कोठे आत्मप्रतीतीचा व आत्माविष्काराचा कल्लोळ जाणवतो की काय, तें सहृदयतेला साक्ष ठेवून स्वतःलाच विचारून पाहावें. या कवितांत आलेले अलंकार हे त्यांतील भावनेच्या उत्कटतेंतून स्वाभाविकपणें आणि अनिवार्यपणें निर्माण झालेले नसल्यामुळे खोटे अलंकार आहेत, असेंच म्हटलें पाहिजे.

वाङ्मयाचें मूल्यमापन व रसग्रहण करतांना खऱ्या अलंकारांनी युक्त असें कोणतें वाङ्मय आहे आणि खोट्या अलंकारांनी युक्त असें कोणतें वाङ्मय आहे, हें ओळखण्यास रसिकांनी शिकलें पाहिजे. खरें पाहिलें असतां, अलंकार हे कवीच्या आविष्काराकरिता धडपडणाऱ्या उत्कट व्यक्तित्वाचे स्वाभाविक उन्मेष असतात; त्यामुळे त्यांना 'अलंकार' ही संज्ञा तितकी योग्य वाटत नाही; 'अलंकार' या संज्ञेंतून जो जडत्वाचा, बाह्योपाधित्वाचा व कृत्रिमत्वाचा अर्थ सूचित

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होतो, तो मीं प्रतिपादित असलेल्या अलंकार-विषयक दृष्टिकोनाशीं मुळीच जुळत नाहीं; मला जो त्यांच्या स्वाभाविकतेच्या कवीच्या व्यक्तित्वाशीं असणाऱ्या एकरूपतेच्या अर्थाचा पुरस्कार करावयाचा आहे, तो 'अलंकार' या संज्ञेतून सहजपणें प्रकट होत नाही. त्या दृष्टीने 'अलंकार' या संज्ञेऐवजी 'विभ्रम' ही संज्ञा अधिक योग्य होईल, असें वाटतें. सुंदर तरुणीच्या विभ्रमांत तिच्या अंतःकरणांतील भाव स्वाभाविकपणें व्यक्त झालेले असतात; तिच्या व्यक्तित्वाचे ते सहजस्फूर्त तरंग असतात. आणि, मुख्य गोष्ट ही की, विभ्रमांत बाह्योपाधित्व मुळीच नसतें. तेव्हा, विभ्रमांतहि खोटे, ओढून ताणून आणलेले विभ्रम राहूं शकतात, हें लक्ष्यांत घेऊनहि 'अलंकार' व 'विभ्रम' या दोनपैकी 'विभ्रम' हीच संज्ञा आतापर्यंत प्रतिपादिलेल्या विचारसरणीशीं त्यांतल्या त्यांत अधिक सुसंगत होईल, असें वाटतें.

पण 'अलंकार' किंवा 'विभ्रम' यांपैकी कोणतीच संज्ञा निवडण्याचा प्रश्नच उद्भवत नाही; कारण त्यांची कांहींच आवश्यकता नाही. अलंकाराच्या बाह्योपाधित्वावर आणि कृत्रिमत्वावर भर देणाऱ्या आजपर्यंतच्या अलंकारशास्त्राने वाङ्मयाच्या मूल्यमापनाला आणि रसग्रहणाला भलतेंच अनिष्ट वळण लावलें आहे. काव्यांत प्रकट होणाऱ्या कवीच्या व्यक्तित्वाच्या एकात्मतेकडे दुर्लक्ष करण्यांत येऊन 'या काव्यांतली ही उपमा, हें रूपक, हा दृष्टान्त' अशा तऱ्हेचें विच्छेदन करण्यांत येऊं लागलें, एवढेंच नव्हे, तर त्या विच्छेदनाचें पद्धतशीर शास्त्रहि बनविण्यांत आलें. या परंपरागत अलंकारशास्त्राने सुरू केलेल्या व भक्कम प्रतिष्ठा मिळवून दिलेल्या या विच्छेदीकरणाबद्दल क्रोचेने जें म्हटलें आहे, तें अगदी खरें आहे. तो म्हणतो—" Such division (i. e. division of a poem into scenes, episodes, similies, sentences) annihilates the work as dividing the organism into heart, brain, nerves, muscles and so on, turns the living being into a corpse. " आपल्याकडील संस्कृतामध्येहि एका पट्टीच्या जातिवंत रसिकाने मम्मटाच्या 'काव्यप्रकाशा' संबंधी असेच उद्गार काढले आहेत. तो म्हणतो—

काव्यप्रकाशो यवनः काव्यालीच कुलाङ्गना ।
अनेन प्रसभाकृष्टा कष्टामेषाश्नते दशाम् ॥

वाङ्मयाच्या मूल्यमापनाला आणि रसग्रहणाला योग्य दिशा लागावी, असें वाटत असेल, तर या 'यवना' ची प्रतिष्ठा तावडतोब समूळ नष्ट करून टाकलीच पाहिजे आणि विशिष्ट काव्याच्या वा वाङ्मयीन कृतीच्या रसिकान्तःकरणांवर साकल्याने होणाऱ्या परिणामाचें खरें रहस्य आकलन करण्याच्या दृष्टीने त्यांतील शब्दार्थालंकार वेगळे काढून त्याची फोड करण्याचे अव्यापारेषु व्यापार करण्याच्या प्रवृत्तीला आळा घातलाच पाहिजे !

• • •

शमन

गो. रा. दोडके, बी. ए.

● नागपूरचे रा. दोडके हे कलावंत लेखक आहेत, याची साक्ष त्यांच्या प्रस्तुत शब्दचित्रावरून पटेल. रखमा मोलकरणीचें हें शब्दचित्र चिमुकलें, पण चटकदार आहे. तिची नागपुरी भाषा तर फर्मास आहे ! शब्दचित्राचा शेवटहि सुंदर आहे.

* * *

आज रखमाच्या जिवाचा संताप झाला होता. जीवनाविषयीं उबग तिच्या मनांत निर्माण झाला होता. सकाळीं उठून धुणंभांडीं करायला निघतांना तिनं कुणाचं तोंड पाहिलं होतं, कुणास ठाऊक ! एखादं नवीन कारण होऊन तिच्या मनावरचा ताबा उडून ती आपल्याशींच बोलूं लागली

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

की, म्हणायची, “कोनाचं काळं तोंड पाहिलं, कोनास ठाऊक आज!” आणि, नंतर खरोखरच पहिल्यांदा आपल्या नजरेला कोण आलं हें आठवायचा ती यत्न करायची. जे जे नांवाजलेले दळभद्रे तिला माहीत होते, त्यांच्यापैकी कुणाला आपण पाहिलं की काय, म्हणून तिनं आठवून पाहिलं. पण त्यांच्यापैकी एकहि सकाळीं तिला सामोरा आला नव्हता. मग ती इतरांपैकी कुणाला आपण पाहिलं की काय, म्हणून आठवून बघायची. पण कुणीच ध्यानांत येईना! मग ती आपआपल्याशींच खूब चडफडायची!

चडफडणार नाही तर काय! आतावर काम केलेल्या दोन घरीं, जणू काय, आज तिचा अंतच पाह्यचा आदले रात्रीं कट झाला होता! पहिल्या घरीं ती गेली, तों तिथं भांड्यांचा खूप मोठा घाणा पडला होता. ती त्याच्याकडे बघतच राहिली! तिला तसं बघून मालकीणबाई म्हणाल्या, “रखमे ल्वकर ल्वकर घे हो. काल रात्रीं पाहुणे आले. बारा वाजतां झोपेंतून उठावं लागलं”—म्हणून बाईनं जितकीं जास्त भांडीं खरकटीं करता येतील, तितकीं केलीं! घासावं थोडंच लागते? अन् सगळीं जाळून टाकलीं! आता चिच मागितली त म्हणल ‘महाग आहे.’ घरींच राह्यली असती, त बरं झालं असतं. तापहि नाही आला मज. मग सांगून देह्लं असतं, येत नाही म्हणून. बडबड केली असती न् मग भांड्यास हात लावला असता.

दुसऱ्या घरीं ती गेली, तर तिथं चोरूनलपून गव्हाचं अर्धं पोतं आणलं गेलं होतं. मका खाऊन कंटाळलेल्या लोकांना आज गव्हाची पोळी म्हणजे पक्वान्न होतं. इथल्या बाईला घाई झाली होती, गहूं दळून येतात केंव्हा न् घरचे लोक पोळ्या खातात केंव्हा! कणीक जर सकाळीं सातला दळून आली असती, तर आज चहाहि घेतला नसता या लोकांनी. रखमेला पाहून मालकीणबाई म्हणाल्या “रखमे गहूं दळून आण. पहा हो. नीट काळजी घे. मागल्या वेळीं कमी आली होती कणीक. तो चक्कीवाला बरोबर पीठ काढून देत नाही, आपल्या हातानं काढून घेशील,”—“रखमा मनांत उद्गारली, “तो माह्या ससराच त व्हय.”—“अन् दळून झालं की, सरळ घरीं ये, नाही तर बसशील बोलत आपल्या सख्यांशीं. अन् हें बघ, आजकाल चक्कीवाला जास्त पैसे घ्यायला लागला आहे, बघवून पहा त्याला”—“काह्यले? दोनचार पैसे वाचवले त हे सुमडी आपल्या पेटींत दडवून ठेवते. नवऱ्यास जास्तीचा भाव सांगते. नवऱ्यानं एखादा आना मागितला त हे म्हन्ते, “कोच्या देऊं? तुम्ही का मज पैसे देता, का का करता?” तिने पुष्कळदा मालकीणबाईचा अभिनय आपल्या सानांख्यांच्या मेळाव्यामध्ये केला होता, इतरांना हसवलं होतं, आपणहि हंसली होती! आताहि तिला मनांतल्या मनांत हसूं येत होतं, पण मुखावर एकाएकी संताप उमटला. मालकीणबाई बोलत होत्या, “तुझ्याच बरोबर दळण पाठवलं, तर कमी का येतं ग? त्या गोविंदाबरोबर, श्याम्याबरोबर पाठवलं, तर बरं भरतं.” मनांतल्या मनांतच रखमेनं उत्तर दिलं, “मी आहे चोट्टी, लेहडी! तुमच्या एथं चोरी करायसाठी त राह्यली! मले माहं पोट नाही जाळता येत कोठं”—ओठांतून मात्र हें कांहीच बाहेर आलं नाही, फक्त डोळे मात्र बोलले. मालकीणबाई म्हणाल्या, “मी तुझ्यावर नांव नाही घेत ग.”

–“बरी घेशील, दात नाही पाडणार!” मनांतच

चक्कीवरून दळण दळून आणलं. नंतर घरांतलीं इतर कामं तिनं घाईघाईनं उरकलीं. मग ती घरांतून बाहेर पडली ती संतप्त मनानंच. मालकीणबाई बोलत असतांना मनाची जी भाषा मनांतच राहिली, ती आता प्रकट झाली. ती मोठ्याने बोलत व हातवारे करीतच तिसऱ्या घरीं कामाला चालली होती. जात्यायेत्या लोकांनी तिच्याकडे पाहिलं देखील. एक हुज्जतखोर तिला ऐकूं जावं म्हणून ओरडला, “पिसाट!” पण तिच्या कानापर्यंत तो शब्द गेला नाही. तिच्या बाजूने चालणाऱ्या व तिचा तणतणाट ऐकून घेणाऱ्या अदृश्य व्यक्तीला ती म्हणत होती,” अडलं माहं खेटर! आता उद्या निजून राहतों घरीं! शाम्या, गोंद्या, दगड्या, आले बोंबलत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तरी मी नाही जानार कामाले! हो ऽऽ! मजहि कांही अशीतशी नका समजूं म्हना! तुम्ही एक त मी सात!"

तिसऱ्या घरीं तिचं काम बरंच हलकं झालं होतं. तिथं लहान मुलामाणसांचा संसार होता. स्वैपाकाची भांडीं आजीबाईनी घासून घेतलीं होतीं. उरलेलीं तिनं उटलीं. रखमेनं भांडीं उट्ठन न्हाणीघरांत धुवायला आणलीं. भांडीं धुतांधुतां तिनं आजचा, दोन घरचा अनुभव आजीबाईना ऐकवला. यथेच्छ निंदा करून घेतली! आपलं मन हलकं केलं, म्हाताऱ्या आजीबाईनी भांडीं धुऊन घेतलीं, म्हणून धन्यवाद दिले. त्यांची इतरांशीं तुलना केली व शेवटीं, "माणसं काह्यचे जी, आजीबाई, हे! डुकरं तरी वरे याहिच्या-परिस!"

—या वाक्यानं तिनं आपलं त्रागाकांड समाप्त केलं!

भांडीं धुवून झालीं. ती तिनं येरझारा करीत पडवींत वाळूं घातलीं. आता केवळ एकदोन धोतरं, एकदोन चड्डया, लहान लहान सद्रे धुऊन वाळूं घातले की, तिचा जीव निश्चिंत होणार होता. तिचं काम संपणार होतं व मग ती सुखांत घरीं जाणार होती.

तिनं न्हाणीघरांतील दगडावर व आवतीभोवती पडलेलं धुणं उचललं, बादलींत भरलं, बादली नळाखाली ठेवली व चाबी फिरवून आजीबाईशीं बोलत उभी राहिली. बादली भरायला लागेल इतका वेळ गेला, असं तिला वाटलं, तेव्हा तिनं बादलींत कपडा काढायला हात घातला. पण हाताला पाणी लागलं नाही." आटला माय नळ!—निराशेनं, संतापानं, खेदानं ती म्हणाली, "आता पुन्हा सांजपारी येवाचं आलं की नाही नशीवास! कोना कोल्ह्याचं तोंड पाह्यलं होतं, कोनास ठाऊक! आता कांही या नळाचं जात होतं थोडा थांवला असता त? मले त बाई असा तरास आला—!" आजीबाई तिच्याकडे बघत हंसत होत्या. रखमेनं त्यांच्याकडे पाहिलं, तिनंहि हसून दिलं, उद्गारली," नाही त का?"—

इतक्यांत तिच्या कानावर घंटेचा आवाज आला, मोटारचाहि आला. मोटार घरापुढून निघून गेली. "आग, आग!"- ओरडतच रखमा बाहेर पळाली. थोड्या वेळानं ती घरांत आली, "आजीवाई त्या रामा कलाराचं घर पेटलं, एक पोरगी जळून गेली. एक भीत नाही उभी! कलार गेला उमरावतीला, बायको गेली का न बाजाराले. कसं व माय, देव कसं आनते कोनावर!" बोलतां बोलतां तिचं अंग शहारून आलं, डोळे आंसवांनी डबडबले!

आजीबाईंच्या डोळ्यांना आसवं दिसूं नयेत, म्हणून तिनं मान फिरवली, तों तिची नजर नळा-खाली ठेवलेल्या बादलीकडे गेली.

कपडे बादलीच्या तोंडापर्यंत आले होते. बादलींतून पाण्याच्या धारा खाली ओघळत होत्या. एक बाहीहि काठावरून बाहेर लोंबकळत होती. नळाजवळ ती बोलत बोलत लगबगीनं गेली. "वरं झालं, माय, माहं काम तरी होऊन गेलं. बंबानं आनलं असल हे पानी!"

• •

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इसाडोरा डंकनचीं मुलें !

शरच्चंद्र टोंगो, बी. ए.

● इसाडोरा डंकन (जन्म : सॅनफ्रॅन्सिस्को, स. १८८०) या प्रसिद्ध अमेरिकन नर्तिकेचें नांव जगांत महशूर आहे. तिनें लिहिलेलें आत्मचरित्र 'My Life' ही एक अति सुंदर वाङ्मय-कृति आहे. तिचें लेखन पुरें झाल्यानंतर कांही महिन्यांनीच मोटारच्या अपघातांत तिचा दुर्दैवी शेवट झाला. (नाईस, १९२७)

तिचा लग्नांत विश्वास नव्हता. ती आजन्म अविवाहित राहिली. पण त्याचबरोबर मातृत्वाला तिनें नकार दिला नाही. तिच्या आत्मचरित्रांतून ज्या दोन पुरुषांपासून तिला मुलं झालीं, त्यांचा परिचय, तिच्या तीनहि मुलांचा जन्म आणि त्यांचा दारुण अंत यांची हकीकत तिच्याच शब्दांत दिली आहे.

तिचें हें बंडखोर मातृत्व तिच्या जीवनाचा एक चमकदार पैलू आहे.

* * *

१९०५ सालांत एका रात्रीं मी बर्लिनमध्ये नृत्य करीत होतें. नृत्य करीत असतां मी कधीच प्रेक्षकांकडे लक्ष्यपूर्वक पाहत नाही. ह्या रात्रीं मात्र समोरच्या रांगेंत बसलेल्या एका व्यक्तीची मला जाणीव झाली. ती व्यक्ति कोण, तें मी पाहिलं नाही की, ती व्यक्ति मला दिसली पण नाही. पण तिच्या तेथल्या अस्तित्वाची मला जाणीव झाली खरी !

माझं नृत्य आटोपल्यावर मला एक देखणा तरुण भेटायला आला. पण तो रागावलेला दिसला.

'तूं सुंदर आहेस ! अजब आहेस ! पण तूं माझ्या कल्पना का चोरल्यास ? माझा देखावा तूं आणलास कुठून ?

'म्हणता काय तुम्ही ? हे निळे पडदे माझे आहेत. मी पाच वर्षांची होतें, तेव्हापासून मी याच निळ्या पडद्यांसमोर नाचते.'

'नाही ! ती माझी कल्पना आहे. पण एवढं खरं की, त्या देखाव्यांना योग्य अशी स्त्री जी मी कल्पिली, ती तूंच आहेस. माझ्या स्वप्नांचं मूर्त-स्वरूप तूं आहेस.'

'पण तुम्ही कोण ?'

'मी एलेन टेरीचा मुलगा.'

एलेन टेरी, स्त्रीचा माझा आदर्श ! एलेन टेरी...

क्रेग उंच होता, त्याचा चेहरा त्याच्या सुंदर आईसारखा होता; पण तो अधिक नाजूक दिसला. त्याला पाहिल्याबरोबर त्याच्या कोमलपणाची जाणीव होई; जवळ जवळ स्त्रीचा अशक्तपणा ! त्याचे हात, बोटांचीं रुंद अग्रं अन् चौकोनी अंगठे ही मात्र त्याच्या शक्तीची खूण होती.

क्रेगला मीं जेवायला बोलावलं.

जेवण झाल्यानंतर माझी आई नि इतर दुसरे एकामागून एक झोपले. तो अतिशय उत्साहाने आपल्या कल्पना, आपली कला नि महत्त्वाकांक्षा यांबद्दल बोलत होता. त्याचं भाषण मला अतिशय आवडलं.

आम्ही दोघे जिना उतरून खाली आलों, एक टॅक्सी ठरवली अन् पोट्सडॅमला गेलों. तेथे पोंचलों तेव्हा प्रातःकाळ झाला होता. एका छोट्या हॉटेलचे दरवाजे नुकतेच उघडले जात होते. आम्ही तेथे कॉफी घेतली सूर्य आकाशांत बराच वर आला तेव्हा आम्ही बर्लिनला परत गेलों.

बर्लिनला मी माझ्या एका मैत्रिणीकडे सायंकाळपर्यंत झोपलें. सायंकाळीं मी क्रेगबरोबर त्याच्या स्टुडियोंत गेलें. त्याचा स्टुडियो बर्लिनमधल्या एका उंच इमारतीच्या टोकावर होता.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

इतर स्त्रियांना आपले प्रियकर कसे आठवतात, तें मला माहीत नाही. मला मात्र तो असाच आठवतो की, पहिल्या रात्रीं त्या स्टुडियोंत जेव्हा त्याचं शुभ्र, लवचिक नि कांतिमान् शरीर वस्त्रांच्या कोशांतून बाहेर पडलं, अन् त्याच्या स्वयंपूर्णसौंदर्यानं माझे डोळे दिपून गेले.

हा कांही एक तरुण मनुष्य नव्हता की, जो एका युवतीची प्रणयाराधना करीत होता. ही दोन आत्म्यांची भेट होती···कांही आनंद खरोखर इतके संपन्न नि संपूर्ण आहेत की, त्यानंतर जगण्यांत अर्थ नाही.

त्याच्या स्टुडियोंत कोच नव्हता, आरामखुर्ची नव्हती की धड जेवण नव्हतं. त्या रात्रीं आम्हीं जमिनीवर झोपलों. मी तेथे दोन आठवडे झोपलें. त्यानंतर मी घरीं गेलें.

जून महिन्यांत मला समुद्रकिनारीं राहण्याची तीव्र इच्छा झाली. नॉर्डविक् नांवाच्या खेडेगांवीं मी एक घर भाड्यानं घेतलं. मी इतकी अननुभवी होते की, मूल होणं ही एक नैसर्गिक क्रिया आहे, असंच मी समजत होतें. क्रेग येथे येऊन मला भेटून गेला.

समाजांत मिसळण्याची मला भीति वाटूं लागली. लोक कांही कांही बोलत. गरोदर मातेच्या पावित्र्याची खरोखर काय कदर केली जाते ? ऑगस्ट गेला अन् सप्टेंबर आला. आश्चर्याची गोष्ट अशी की, दिवसेंदिवस माझं सुंदर शरीर फुगीर होत चाललं, माझं वक्षःस्थळ मोठं नि मऊ झालं अन् माझीं चपळ पावलं सावकाश पडूं लागलीं. वाट पाहण्याचे रात्रीचे निर्दय नि असहाय्य तास; फुगीर शरीरावर दाबून धरलेल्या हातानं बाळाला निरोप देण्याचा प्रयत्न...... मातृत्वाच्या वैभवाला केवढी मोठी किंमत आम्हाला द्यावी लागते !

एके दिवशीं दुपारीं आम्ही चहा घेत असतां जोरदार आवाजाची मला जाणीव झाली; जणूं काय, कुणीतरी माझ्या पाठीच्या मधोमध जोराचा दणका दिला. कुणी तरी माझ्या पाठीच्या कण्यांत गिरमिट चालवून तो फोडण्याचा प्रयत्न करीत आहे, इतक्या भयंकर वेदना होऊं लागल्या ! दोन दिवस अन् दोन रात्री या महा भयंकर यातना चालूंच होत्या.

माझी मुलगी देखणी होती. तिचे डोळे निळे अन् केस पिंगे होते. अन् केवढं आश्चर्य ! तिचं तोंड माझ्या स्तनाजवळ आलं अन् दंतविहिन हिरड्यांनी चावत, ओढत ती दूध पिऊं लागली. कोणत्या मातेनं आतापावेतों या भावनांचं वर्णन केलं आहे की, जेव्हा बालकाचं मुख तिच्या स्तनाग्रांना चावतं अन् तिच्या वक्षस्थळांतून दुधाचा स्रोत वाहतो ? हें चावरं निर्दय मुख प्रियकराच्या मुखासारखंच नाही का ? अन् तसं पाहिलं, तर आपल्या प्रियकराचं मुख आपल्याला आपल्या बालकाची आठवण देतं !

* * *

त्या वेळीं मी पॅरिसला होतें.

माझी नृत्यशाळा चालविण्याची मला फारच गरज होती. बँकेतले माझे सगळे पैसे या शाळेपायीं खलास झाले. एखादा लक्षाधिश गाठण्याशिवाय मला दुसरं गत्यंतर उरलं नाही. 'एखादा लक्षाधीश शोधायलाच हवा' हें मी दिवसांतून शेकडो वेळां म्हणत असे.

एके दिवशीं सकाळीं एका विशेष यशस्वी प्रयोगानंतर मी आरशासमोर बसलें होतें. माझी मोलकरीण एक कार्ड घेऊन आली. त्यावर मी एक सुप्रसिद्ध नांव वाचलं अन् माझ्या मेंदूंत अचानक एक लकेर निघाली : 'हाच माझा लक्षाधीश !'

'येऊं दे.'

तो उंच होता, त्याचे केस कुरळे होते अन् त्यानं दाढी वाढवली होती. तो बोलला गोड आवाजांत, पण तो लाजाळू दिसला. दाढी असलेल्या एखाद्या मोठ्या मुलासारखा मला तो वाटला.

तो म्हणाला,

'तुझी कला, शाळेच्या ध्येयाबाबतचं तुझं धैर्य मला मनापासून आवडतं. मी तुला मदत करायला आलों आहे. तुझ्या सगळ्या विद्यार्थ्यांना समुद्रकिनारीं नेऊन तिथं नवीन नवीन नृत्यं बसवायला तुला आवडेल का ? खर्चाची फिकीर करायचं

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुला कांही कारण नाही. तें सगळं मी करीन. तूं एक महान् कार्य केलंस; थकून गेली असशील तूं...'

लोहेनग्रिन मुलांशीं मोठा प्रेमळ नि गोड होता. प्रत्येकाच्या सुखसोयीकडे तो मोठ्या दक्षतेनें पाहत असे. त्याच्याबद्दल मला आधीच उपकाराची जाणीव होती, पण या त्याच्या वृत्तीमुळे मला त्याच्याबद्दल विश्वास वाटूं लागला. त्या वेळीं मी त्याला माझा शिलेदार समजत असे कीं, ज्याची दुरून पूजा करावी.

मी आणि मुलं आम्ही समुद्रकिनारीं टेकडीवरच्या बंगल्यांत राहत असूं. लोहेनग्रिन मात्र एका अद्यावत् हॉटेलमध्ये राहत होता. एके दिवशीं पुष्कळ लोकांना आमंत्रण देऊन तेथे बॉलनृत्य झालें. हिऱ्यांच्या अलंकारांनी मढविलेली एक स्त्री तेथे आली होती. मी तिच्याकडे पाहिलं, तेव्हा मला यातना झाल्या. परंतु लवकरच तिच्या बरोबर मी पिसाटासारखी नृत्य करूं लागलें.... खरोखर प्रीति नि द्वेष किती सारखे सारखे आहेत!

अचानक मला टेलिफोनवर बोलावण्यांत आलं. एरिका नांवाची माझ्या शाळेची एक छोटी मुलगी अकस्मात् आजारी पडली-अन् ती आयुष्याचे शेवटचे क्षण मोजत होती. मी घाईनं लोहेनग्रिनला फोनवर बोलावलं......आपल्याला डॉक्टरला बोलवायला हवं......अन् तिथंच टेलिफोन–बॉक्समधल्या सान्निध्यांत, आम्हां दोघांनाहि लाडक्या असणाऱ्या एका व्यक्तीबद्दलच्या सामान्य धास्तीच्या ताणाखाली आमची तटबंदी ढासळली अन् आमचे ओठ प्रथमच जुळले. परंतु आम्ही एक क्षणहि गमावला नाही. डॉक्टरांना बरोबर घेतलं. छोटी एरिका अत्यवस्थ होती, तिचा चेहरा काळाठिक्कर पडला होता...दोन तासानंतर उजाडलं अन् डॉक्टरांनी सांगितलं, 'एरिका बचावली!'

आम्ही परत कॅझिनोंत गेलों. त्या हिरेजडित स्त्रीचं आमच्या निघून जाण्याकडे लक्ष होतं. आम्ही परत आलों, तेव्हा मत्सरग्रस्त नजरेनं टेबलावरचा चाकू उचलून ती लोहेनग्रिनकडे धावली. सुदैवानं त्यानं तिचा हेतू ओळखला. तिचं मनगट पकडून एका क्षणांत त्यानं तिला आपल्या मस्तकावर उंच धरलं अन् अशाच अवस्थेंत तिला स्त्रियांच्या खोलींत नेलं. तेथल्या नोकराला त्यानं एवढंच सांगितलं कीं, तिला वाताचा झटका आला अन् तिला पाणी द्यायला हवं. जमलेल्यांना वाटलं, हा एक कार्यक्रमांतला आधीपासून योजून ठेवलेला विनोदी भाग आहे.

...त्याचं मुलांबद्दलचं औदार्य, एरिकाच्या आजारपणांत त्यानं दाखवलेली काळजी अन् त्याची व्याकुळता यांनी माझी प्रीति जिंकली...

माझ्या जीविताला दोनच हेतू आहेत— प्रीति अन् कला. पुष्कळदा प्रीतीनं कलेचा नाश केला अन् पुष्कळदा कलेच्या करड्या जाणीवेनं प्रीतीचा दुर्दैवी शेवट झाला. या दोघांत मैत्री नाही, पण सदैव झगडा मात्र आहे.

या मनःस्थितींत मी माझ्या एका डॉक्टर मित्राला मिलानला बोलावलं अन् मी माझी समस्या त्याच्यासमोर मांडली.

तो म्हणाला,

'तुझ्यासारख्या कलावंतानं असा कोणताच धोका पत्करूं नये कीं, ज्यामुळें जग तुझ्या कलेला कायमचं मुकेल. हें अशक्य आहे. मानवजातीविरुद्ध हा गुन्हा तूं करूं नये.'

मी विचार केला: जीवनांत, प्रीतींत अन् निसर्गाच्या नियमांत माझा विश्वास आहे...माझ्या मित्राला मी त्याप्रमाणें सांगितलं. नंतर मी व्हेनिसला गेलें अन् माझ्या कन्येला जवळ घेऊन तिच्या कानांत मी हळूच सांगितलं: 'तुला छोटा भाऊ होणार आहे.'

समुद्रकिनारीं एका बगीच्यांत मी राहत असे...स्त्री ही खरोखर कधी तरी कलावंत होऊं शकेल काय? कारण कलेसाठी सर्वस्वाचा त्याग करावा लागतो अन् प्रेम करणारी स्त्री जीवितासाठी सर्वस्व देतें...

एक मे ला सकाळीं समुद्र निळा होता, सूर्य प्रकाशत होता अन् अवघा निसर्ग मोहोरून उल्हसित दिसला; अशा वेळीं माझा पुत्र जन्मला.

× × ×

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९१३ मधली गोष्ट! व्हर्साय!

ती सौम्य धूसर सकाळ होती. खिडक्या उघड्या होत्या अन् त्यांतून दिसणाऱ्या बागेंतलि झाडांवर पहिला बहर दिसूं लागला. मी इतकी आनंदित झालें कीं, मी एकदम बिछान्यांतून बाहेर आलें अन् माझ्या मुलांबरोबर मी नृत्य करूं लागलें. आम्ही तिघेहि खिदळत होतों. परिचारिका हसत आमच्याकडे पाहत होती.

अचानकच टेलिफोनची घंटा खणखणली. तो लोहेनग्रेनचा आवाज होता. त्यानं मला विनंती केली की, मी मुलांना घेऊन पॅरिसला जावं अन् तेथे त्याला भेटावं. त्यांना त्यानं गेल्या चार महिन्यांत कांही पाहिलं नव्हतं.

पण नर्स मात्र म्हणाली, 'मला वाटतं, पाऊस येईल-त्यांनी न जाणंच बरं.'

मी तिची सूचना ऐकली नाही. व्हर्सायपासून पॅरिसपावेतों माझ्या छबकड्यांना बाहूंत घेऊन गाडींतून मीं गेलें. त्याला आपल्या मुलाला अन् माझ्या मुलीला भेटून आनंद झाला. मुलांना थांबवून घेण्याबद्दल मीं परिचारिकेला विचारलं, तेव्हा ती म्हणाली 'मुलांना विश्रांती हवी आहे. परतायला पाहिजे.'

मी मुलांचं चुंबन घेतलं अन् म्हणालें, 'मीहि पण लवकरच येईन.' माझ्या मुलीनं खिडकीच्या तावदानावर आपले ओठ टेकले. मीहि वाकले अन् जिथं तिचे ओठ टेकले होते, तेथे काचेचं मी चुंबन घेतलं. त्या काचेच्या थंड स्पर्शानं मला कोणती तरी गूढ अशी जाणिव झाली!

नंतर मी कांचावर आडवी झालें. मनाशीं मी म्हणत होतें, 'खात्रीनं मी अतिशय सुखांत आहे—जगांतील सर्वांत सुखी स्त्री! माझी कला, यश, दैव, प्रीति—पण सगळ्यांत विशेष म्हणजे माझीं देखणी मुलं!'

इतक्यांत अमानुष असं ओरडणं माझ्या कानावर आलं. मी वळून पाहिलं. लोहेनग्रेन तेथे होता, पण दारु प्यालेल्या मनुष्याप्रमाणें त्याचा तोल सांभाळतां येईना. खचून जाऊन तो माझ्या-समोर पडला आणि म्हणाला, 'मुलं—मुलं—मेली!'

मला आठवतं, मी शांत राहिलें. फक्त माझ्या घशांत जळजळ वाटली. जणूं काय, मी निखारे खाल्ले! मीं त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. मीं त्याला सांगितलं, 'हें अशक्य आहे.'

तेथे जमलेल्यांना वाटलं या धक्क्यानं कदाचित् मी वेडी होईन. पण माझ्या सभोवती सगळेजण रडत होते, तरी मी रडलें नाही. उलटपक्षीं सगळ्यांना समजावण्याची मला तीव्र इच्छा होऊं लागली. माता स्वतःला विसरून फक्त दोनदांच रडते—जन्म देतांना अन् मृत्यू समयीं. कारण जेव्हा मला कळलं कीं, ते थंडगार हात आता माझे हात कधींच दाबणार नाहीत, तेव्हा मला माझे हुंदके ऐकायला आले— तेच कीं, जे मी त्यांच्या जन्माच्या वेळीं ऐकले... का बरं तेच! कारण पहिले तर अलौकिक आनंदाचे आहेत, अन् दुसरे दुःखाचे. का तें मला माहीत नाही. पण एवढं खरं की, ते एकच आहेत!

जुलै १९१४ मध्ये पृथ्वीच्या पाठीवर एक निष्ठुर जुलुम घडून आला. तो मलाच जाणवला, असं नाही, तर माझ्या लहानग्या विद्यार्थ्यांनाहि जाणवला. आम्ही सगळे गच्चीवरून पॅरिसची शोभा पाहत असतां मुलं नेहमीच अबोल नि नरम दिसत. आकाशांत मोठमोठाले ढग जमा झाले. जमिनीवर गूढ निःस्तब्धता नांदूं लागली. माझ्या पोटांत असलेल्या बालकाच्या हालचाली सुद्धा मला अशक्त, अशाच भासल्या, मला वाटतं, दुःख नि शोकाचं नव्या जीवनांत परिवर्तन करण्याचा जो मी खटाटोप केला, त्यानं मी थकून गेलें.

जुलै महिन्यांत लोहेनग्रेननं सुचवलं की, इंग्लंड-मध्ये त्याच्या डेव्हॉनशायरच्या घरीं मुलांनी सुट्टी घालवावी. त्याप्रमाणें मीं मुलांना पाठवलं.

एक ऑगस्टला मला प्रसूतिवेदना झाल्या. त्या दिवशीं उष्णता होती अन् माझ्या खोलीच्या खिडक्या उघड्या होत्या. माझं ओरडणं, माझं दुःख, माझ्या वेदना अन् बाहेरच्या पडघमचा आवाज नि दवंडीवाल्याचं ओरडणं एकांत एक मिसळून गेलं. 'युद्ध आहे का? मला आश्चर्य वाटलं...पण माझ्या मुलाला जन्माला यायलाच हवं!

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझ्या मुलाचं मीं रडणं ऐकलं.

त्यांनी माझ्या बाहूंत छोकरा दिला, तेव्हा शोकाच्या नि दुःखाच्या काळाचं परिवर्तन केवढ्या आनंदांत झालं...पडघम वाजत होते...माझं मूल माझ्या बाहूंत सुरक्षित होतं. आता त्यांना खुशाल युद्ध करूं द्या. मला त्याची पर्वा नाही!

...मानवी आनंदाची केवढी ही घमेंड!

सायंकाळ झाली. माझ्या खोलींत लोक जमले होते. ते मला म्हणाले, 'तूं पुन्हा सुखी होशील.' मग एकेक असे ते निघून गेले!

अचानक तो लहानगा जीव गुदमरून गेला. त्याला श्वासोच्छ्वास करतां येईना. मी परिचारिकेला बोलावलं. ती आली अन् घाबरूनच तिनं त्याला घेतलं. पलीकडच्या खोलींतून ऑक्सिजन, गरम पाणी मागितलं तें ऐकायला आलं.

माझ्या दुःखाचा कळस झाला! माझ्या पहिल्या यातनांची ही पुनरुक्ति तर होतीच, पण यांत आणखी कांही जास्त होतं. तेथे व्यथित नि असहाय्य अशी मी अश्रु, दूध नि रक्त यांचा तिहेरी फवारा झालें होतें!

• • •

संपादकीय

लेखनाची तारीख १ जुलै १९४७

हिंदुस्थानची फाळणी व नवें नेतृत्व

हिंदुस्थानची फाळणी आता वज्रलेप झाली आहे. पाकिस्तान व हिंदुस्थान हीं दोन स्वतंत्र राष्ट्रें आता निश्चित अस्तित्वांत येणार! हैद्राबाद, त्रावणकोर-वगैरे कित्येक संस्थानांचें सवते सुभेहि होऊं पाहत आहेत!—अशा प्रकारें इंग्रज व मुसलमान यांचें कारस्थान यशस्वी झालें आहे! इंग्रजांचा कुटिलपणा व मुसलमानांची धर्मांधता या आईबापाच्या पोटीं फाळणीसारखी अवलाद जन्मास न येती, तरच नवल!

या खंडित हिंदुस्थानांतून अखंड हिंदुस्थान आकारास येईल, असें म्हणणारे ढोंगी तरी असले पाहिजेत किंवा खुळे तरी असले पाहिजेत! दरिद्री पाकिस्तान अखेर हिंदुस्थानला शरण येईल, या कित्येक अर्थशास्त्रज्ञांच्या म्हणण्यांतहि बिलकूल 'अर्थ' नाही! हूणांपासून तों मोंगलापर्यंतच्या रानटी टोळ्या भुकेकंगाल होत्या, म्हणूनच त्यांनी या प्राचीन 'सुवर्णभूमीवर' स्वाऱ्या केल्या ना? दरिद्री पाकिस्तानचा तसाच अनुभव येणार नाही, याची शाश्वति काय?

काँग्रेसश्रेष्ठींनी फाळणी अपरिहार्य झाल्यामुळेच तिला मान्यता दिली, हें स्पष्ट आहे. 'अराजकापेक्षा फाळणी पुरवली!'—असें त्यांना वाटणें साहजिक आहे. पण हें अराजकच मुळीं का उद्भवलें, याचा न्यायनिष्ठुरपणाने विचार करावयास नको काय? मुसलमानांच्या गुंडगिरीला इंग्रजांची फूस असली पाहिजे—नव्हे, होतीच व आहेच, हें एखादें पोरहि जाणूं शकतें! तथापि काँग्रेसची 'आध्यात्मिकता' या गुंडगिरीस पर्यायानें पोषक झाली, हें सत्य कितीहि कटु वाटलें, तरी पण दृष्टीआड करतां येत नाही! इंग्रज राज्यकर्ते कितीहि नादान असले, तथापि रानटी गुंडांपेक्षा ते पुष्कळच बरे. म्हणूनच त्यांजवर अंशतः का होईना, काँग्रेसची सत्य-अहिंसेची मात्रा लागूं पडली! पण धर्मांधतेचा वात झालेल्या मुसलमानी गुंडागिरीवर या मात्रेचा प्रभाव बिलकूल चालू शकला नाही!

स्वातंत्र्य मिळविण्याचें व्यावहारिक ध्येय पुढे ठेवावयाचें आणि त्यासाठी साधनें मात्र वापरावयाचीं अध्यात्मांतील—ही विसंगति इतःपर काँग्रेसने सोडून द्यावयास पाहिजे! या विसंगतीमुळे एक चतुर्थांश हिंदुस्थान आपण गमावला व तीच चूक पुढेहि चालू राहिल्यास उरलेला तीन चतुर्थांश हिंदुस्थान गमावण्यास वेळ लागेल, असें नाही! अखिल-भारतीय-काँग्रेस-समितीच्या गेल्या अधिवेशनांत खुद्द राष्ट्रपति आचार्य कृपलानी यांनी गांधीजींची अहिंसा मुसलमानांचे अत्याचार बंद पाडण्यास असमर्थ ठरली असल्याची निःसंदिग्ध घोषणा केली आहे, हें येथे नमूद करणें अवश्य आहे! याच भाषणांत आचार्यांनी कार्यक्षम शूर सैन्य व पोलिस यांनी सुसज्जित अशा केंद्र सरकारची आवश्यकता प्रतिपादन केली होती!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गांधीजींचें महान् विभूतिमत्व व त्यांची महनीय देशसेवा हीं वादातीत आहेत. गांधीजींमुळेच हिंदुस्थानने आतापर्यंतची प्रगति केलेली आहे. पण कृपलानीसारखे कट्टे गांधीवादी विसंवादी सूर काढूं लागले आहेत, याचा अर्थच हा की, उद्याच्या हिंदुस्थानला नव्या नेतृत्वाची जरूरी असल्याची जाणीव प्रत्यक्ष कॉंग्रेसश्रेष्ठींसहि होऊं लागली आहे! फाळणीला मान्यता दिल्याबद्दल कॉंग्रेसश्रेष्ठींवर रुष्ट असलेल्या लोकांनाहि ही वस्तुस्थिति लक्ष्यांत आल्यामुळे त्यांतल्या त्यांत दिलासा वाटूं लागेल!

हें नवें नेतृत्व पत्करणाऱ्या पुढाऱ्यांनी पूर्णपणें वास्तवतावादी झालें पाहिजे. हिंदुस्थानची पाकिस्थान व हिंदुस्थान अशीं दोन शकलें पडलीं, याचा निष्कर्षच हा की, आपलें राज्य हें सर्वस्वीं हिंदु राज्य आहे, हें अनिच्छेने का होईना, आपण गृहीत धरलें पाहिजे. या हिंदु राज्यांत मुसलमान, ख्रिस्ती, पारशी,– इत्यादि सुखेनैव राहोत. त्यांना आपण सदोदित न्यायानेच वागवूं. पण 'न्याय' म्हणजे 'पक्षपात' खचित नव्हे आणि बहुसंख्यांक हिंदूंचा तेजोवध तर नव्हेच नव्हे! उद्याचें हें हिंदु राज्य – हा हिंदुस्थान– लष्करी सामर्थ्यानें व यांत्रिक साधनांनी समृद्ध असाच राहील. औदार्याच्या वृथा कल्पनांनी तो स्वतःचे लचके तोडले जावयास इतःपर राजी होणार नाही. उद्याच्या या हिंदुस्थानांत जातीयता व अस्पृश्यता यांना मुळीच थारा राहणार नाही. त्यांत सर्वदूर आर्थिक समतेचें राज्य नांदूं लागेल. तो नागरिक स्वातंत्र्याची गळचेपी कदापि होऊं देणार नाही. –याप्रमाणें उद्याचा हिंदुस्थान सर्वतोपरी बलसंपन्न व वैभवशाली झाला, म्हणजे मग तो अलम् दुनियेस गांधीजींच्या आवडत्या अहिंसेचें पाठ शिकवूं लागेल! अहिंसा ही सबळांचीच प्रभावी ठरते. दुर्बळांची अहिंसा वांझोटीच नव्हे काय? अहिंसा प्रभावी ठरण्यास तिच्यामागे लष्करी सामर्थ्याची हिंसा उभी राहणें भाग पडावें, हा या अपूर्ण जगाचा परिणाम होय! त्याला कोण काय करणार?

—असा हा भावी हिंदुस्थान आकारास आणणारें नवें नेतृत्व आपणांस हवें आहे. हें नेतृत्व आपणा सर्वांच्या नितांत आदरास पात्र झालेल्या कॉंग्रेस मधूनच उदयास येईल, अशी आशा बाळगण्यास काय हरकत आहे?

संयुक्त महाराष्ट्र होणार?

संयुक्त महाराष्ट्र होणार की काय, अशी आशा वाटण्यास जागा झाली आहे. हिंदी संघराज्याच्या घटनासमितीने भाषावार प्रांतरचनेसाठी एक उपसमिति नेमली होती. या उपसमितीने भाषावार व सांस्कृतिक एकता असलेल्या विभागांचे राजकीय प्रांत बनवावे, अशी शिफारस केली आहे. अर्थात् ही शिफारस प्रत्यक्ष मूर्तींत अवतरावयाची असल्यास संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्याची शक्यता दिसूं लागली आहे, यांत शंका नाही.

याच वेळीं अशीहि 'हवा' उठूं लागली आहे की, वऱ्हाड मध्यप्रांतांतील कांही पुढारी संयुक्त महाराष्ट्राला तोंडाने पाठिंबा देतां देतां अखेर महाविदर्भाचा स्वतंत्र प्रांत बनविण्याचा हट्ट धरून बसणार! समंजसपणाबद्दल नांवाजलेले या प्रांतांतील पुढारी अशी 'पलट' खाणार नाहीत, अशी अपेक्षा आहे!

वऱ्हाडबद्दलच्या बातम्यांचा तर नेहमीच सुकाळ असतो! वऱ्हाडसंबंधीं 'सनसनीदार' वार्ता छापण्याचा कित्येक वृत्तपत्रांचा धंदाच दिसतो! वऱ्हाड निजामाकडे खरोखरच जाणार असल्यास मग संकल्पित संयुक्त महाराष्ट्र कसा काय अस्तित्वांत येऊं शकेल, हा प्रश्न आहे! वऱ्हाड निजामाकडे जाण्यांत वऱ्हाडचें अहित आहे, हें तर खरेंच; पण त्यामुळे मराठी मध्यप्रांताचीहि विलक्षण कुचंबणा होणार आहे!

वऱ्हाड-मध्यप्रांतांतील जनतेने या आणीबाणीच्या प्रसंगीं कांहीहि 'हातचें राखून न ठेवतां' निर्भीडपणें संयुक्त महाराष्ट्राचाच पुरस्कार केला पाहिजे!

बामणगांवकरांचें अभिनंदन

उमरावतीच्या 'उदय' पत्राचे संपादक रा. ना. रा. बामणगांवकर यांच्या वयाला साठ वर्षें पुरीं झाल्याबद्दल त्यांचा कांही स्थळीं गौरव करण्यांत येत आहे, तो समुचितच आहे. बामणगांवकर हे या प्रांतांतील जुने देशभक्त व पत्रपंडित आहेत. सर्व जन्म दारिद्र्य व कष्ट सोसून त्यांनी जनसेवेचें खडतर व्रत आचरिलें आहे. प्रारंभीं देशभक्ति करणारे किती तरी पुढारी उत्तरवदांत जातीयतेच्या आहारीं गेले आहेत व त्या योगाने त्यांनी स्वतःचा अलोट फायदा करून

[पुढील मजकूर मल पृष्ठ २ वर]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लवकरच प्रकाशित होत आहे !

ललित साहित्याद्वारें बहुजन समाजाचें

अंतरंग उघड करणारें

उदयोन्मुख लेखकांना उजेडांत आणणारें

मध्यप्रांत वऱ्हाडांतील पहिलेंच

मराठी मासिक

सागर

४॥. रु. वर्गणी भरून आजच

वर्गणीदार व्हा !

ठिकठिकाणी विक्रेते नेमणें आहेत

जाहिरातीचे खास सवलतीच्या दराबाबत

चौकशी करा !

पत्रव्यवहाराचा पत्ता:–

व्यवस्थापक:–"सागर" मासिक

अकोला (वऱ्हाड).

WANTED

Graduates able to teach Science, Maths, Geography and English to High School Classes. Apply stating qualifications and pay expected. Posts permanent.

Apply to—

The Head Master,

Prabodhan Vidyalaya, Daryapur

Dist. Amraoti, (Berar)

द. ना. ठाकूर यांनीं ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९,४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ